दैनिक
जनप्रभात
सामाजिक पीरवर्तनाचा बुलंद आवाज

अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेचा समारोप

नागपूर, /दिलीप येवले

: ५ दिवसीय अखिल भारतीय नागरी सेवा संगीत, नृत्य व लघुनाट्य स्पर्धा २०२३-२४ चे समारोपीय कार्यक्रम वसंतराव देशपांडे सभागृह येथे पार पडला. स्पर्धेत एकूण ५६५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यापैकी ६६ स्पर्धकांना सुवर्ण, रौप्य व काँस्य पदक व प्रमाणपत्र देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्यावतीने सचिवालय जिमखान्यामार्फत आयोजित अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत २२ राज्यासह ५६५ स्पर्धक सहभागी झाले होते. २ फेब्रुवारीपर्यंत चाललेल्या या स्पर्धेत दररोज संगीत, नृत्य, लघुनाट्य यासह संगीत कला प्रकारातील हिंदुस्तानी शास्त्रीय (गायन) **पान २ वर**

* (आष्टी) वर्धा * शनिवार दि.०३/०२/२०२४ * वर्ष : २ * अंक : २०८ * पाने : ८ * किंगत : ५ रु * मुख्य संपादकः- राहुल गजरे * उपसंपादकः- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादकः-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

गोवंशांच्या जीवनदाना साठी १४०कि मि चा थरारक पाठलाग

गोवंशांची अवैध वाहतूक थांबणार तर कधी?

दै.जनप्रभात
प्रतिनिधी -काटोल/प्रशांत पवार

राज्यात गोवंश हत्या बंदी चा कठोर कायदा असूनही राज्यातून तसेच अन्य राज्यांतून गोवंशाना क्रूरतेने शेकडो वाहनांतून दर रोज वाहून नेले जातात. यामुळे राज्यातील गोहत्या बंदी कायदा असून ही गोवंश हत्येवर पायबंद बसत नाही.या करीता राज्याचे गृह व परिवहन विभागाचे किती लक्ष आहे?की?अर्थ पूर्ण दुर्लक्ष केले जात आहे?हाच खरा प्रश्न उपस्थित होतो आहे. गोवंशांना क्रूरतेने कोंबून कत्तलखान्याकडे वाहून नेणारे वाहन वाहनं चालक /मालक यांचेकरिता कठोर निर्णय बनविले जावे, तर संबंधित वाहन कायम स्वरुपी जप्त करण्यात यावे या सारखे केंद्र व राज्य सरकार चे नियम बनवले जात नाही तोपर्यंत गोवंशांची अवैध वाहतूक ही गृह, परिवहन व अवैध वाहतूकदारांकडून गावो गावी पोसलेले खबरे यांची चांदीच होत राहणार!!!! तर!काही हिंदूत्वादी संघटनेसह गोमाते वर श्रद्धा ठेवनारे युवा संघटना आपल्या जीवाची बाजी लावत गोवंशांची अवैध वाहतूक करणारे वाहनांना पकडून पोलिसांच्या ताब्यात देणारे युवक जीव धोक्यात घालून वाहनांना पकडण्यासाठी प्रयत्न करतात. अशीच काहीशी घटना कोंढाळी भागात २८जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता नंतर घडली.४०गोवंशांना एकाच ट्रेकमध्ये भरून कत्तलखान्या कडे वायू वेगाने नेणाऱ्या जनावरांचे ट्रक ला थांबविण्याचा प्रयत्न केला असता ,४०गोवंशानी भरलेल्या वाहन चालकाने आपले वाहन क्रं एम एच- २९-टी-१४४७ वायूवेग गतीने अमरावती कडे पळ काढला



. या ट्रक ला थांबविण्यासाठी पाठलाग करताना आपले जीव धोक्यात घालून गोवंशांना जीवनदान देण्यासाठी कौन्सिल फॉर ह्युमन राईटस् चे काटोल नरखेड तालुकाध्यक्ष कोंढाळी येथील रहिवासी बबलू बिसेन व त्यांच्या सहकाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करून १४०किमि पाठलाग करून गोवंश वाहून नेणाऱ्या ट्रक ला पोलीसांचे मदतीने पकडण्यात यश आले. गोवंश वाहून नेणारे वाहन नागपूर वरून -अमरावती कडे जात असताना त्यांचे चालकाला वाहनामधे क्रूरतेने भरलेल्या जनावरांना (जीवनदान) देण्याचे दृष्टीने वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता ४०गोवंश वाहून नेणाऱ्या वाहन चालकाने आपले वाहन अतिवेगाने पळविले. तेंव्हा बबलु बिसेन व कोंढाळी येथील अनेक युवकांनी या वाहनाचा पाठलाग केला. जनावरांना अमरावती कडे वाहून नेणाऱ्या ट्रक चालकाने आपले वाहन कारंजा पो स्टे हद्दीत जाण्याआधीच अचानक पणे परत कोंढाळी कडे वळवले, व वायू वेगाने आपले वाहन चालवत राष्ट्रीय महामार्ग(५३/६) च्या खुर्सापार सुरक्षा चौकी लगतच्या जामगढ मार्गे अती दुर्गम मार्गावर वेगाने पवळले व जामगढ ते तरोडा- खैरी-दुर्गम गावातील दाटी च्या मार्गाने वहन हाकत कोंढाली वर्धा राज्य महामार्गा(२४७) वर पोहचला. तो पर्यंत कौन्सिल फॉर ह्युमन राईटस् चे पदाधिकारी बबलू बिसेन आपल्या चार चाकी व कोंढाळी ,दुधाळा,जामगढ, तरोड, खैरी ,खापरी, धामनगाव येथील युवकांनी ही आप आपल्या दुचाकीवरून वाहनाचा पाठलाग केला. जनावरांनी भरलेले वाहन वर्धकडे पळाले तरी बबलू बिसेन व त्याचा सहकार्यांनी पाठलाग करने सोडले नाही. जवळ जवळ १४०कि मी अंतर कापून चित्तथरारक व जीव घेणा पाठलाग बबलू बिसेन तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी केला. पळापळीत पोलीस आप आपल्या हद्दीत प्रयत्न पाठलाग करतांना दिसले खरे,पण! एकाच दिवशी एकाच मार्गावर दोन दोन जनावरांची अवैध वाहतूक करणारे वाहने दिवसाढवळ्या राजेरोज पणे वाहने हाकतात, ज्या मार्गाने जातात त्या पोलीस स्टेशन मधील वाहतूक पोलीस पथक यांना माहिती नाही ? अखेर बबलू बिसेन व गावो गावचे युवक आप आपले जीव धोक्यात घालून गोवंशांना जीवनदान देण्यासाठी वाहनांचा पाठलाग करतात, याबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलीस महामार्ग सुरक्षा पोलीस ही जनावरांच्या वाहनाचा पाठलाग करतात. गावकऱ्यांचे सहकार्याने जनावरांना क्रूरतेने भरलेल्या वाहनांना पकडतात ही मात्र वाहन चालक पळून जाण्यात यशस्वी होतोच!! रविवार २८जानेवारीला काटोल वरून आर्वी कडे एका छोट्या पिक अप मधे पांच बैल कोंबून नेतांना ही दुधाळा -येथील बजरंग दल चे कार्यकर्ते व गावकरी या पिक अप चा पाठलाग करतात मागून कोंढाळी पोलीस व हायवे सुरक्षा पथक ही येते तो पर्यंत गावकऱ्यांनी वाहन अडवतात व वाहन पोलीसांचे ताब्यात देतात. यातही वाहन चालक फरार होतोच. खरे तर!पशू तस्करांचे रैकट जबरदस्त आहे. संबधीत पोलीस स्टेशन चे वाहतूक शाखांचे पोलीस पथक महामार्गावरील वाहतूक नियंत्रण पथक किंवा हायवे सुरक्षा पोलीस पथके कार्यरत असूनही जनावरांना क्रूरपणे वाहतूक केल्या जाते हाच खरा चौकशी चा भाग आहे. या पुर्वी सुद्धा बबलू बिसेन यांनी चक्क कोंढाळी पोलीस स्टेशन पासून २००मिटर अंतरावर जीव धोक्यात घालून गोवंशांना जीवनदान देण्यासाठी प्रयत्न करून गोवंशांना जीवनदान दिले होते. या प्रकरण बब्लु बिसेन ला जीवे मारण्याची (ऐकेवी) धमकी ही मिळाली होती.पण ती धमकी प्रत्यक्ष न दिल्याने त्यावर पुढे पाऊल उचलले नाही.

नागरिकांच्या मते नागपूर पोलीस अधीक्षक हर्ष पोतदार यांनी अमली पदार्थांच्या वाहतूकीवर जसे लक्ष केंद्रित केले आहे. पोलीस अधिक्षक कार्यालयाचे गुन्हे शाखेच्या पथकाचे कामगीरी मुळे सध्यातरी अमली पदार्थांच्या तस्करांचे धाबे दणाणले आहेत. त्याच धर्तीवर पशुतस्करांवर अंकूश बसविण्यासाठी योग्य निर्देशाची गरज आहे. अशी मागणी कोंढाळी भागातील नागरिकांनी केली आहे.

परिवर्तन संस्थेच्या वतीने एकल,विधवा,परित्यक्ता महिलांची अहमदपुरात उद्योजकता कार्यशाळा संपन्न

दै.जनप्रभात
उपसंपादक /लातूर जिल्हा
विष्णू मोहन पोले

अहमदपूर :पती निधनानंतर विधवा झालेल्या किंवा पतिपासून विभक्त रहाणाऱ्या एकल महिलांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह व्यवस्थित चालावा इतरांच्या शेतात रोजगार करण्यापेक्षा स्वतःचा छोटा मोठा व्यवसाय कसा



उभारता येईल त्याकरिता परिवर्तन संस्थेच्या माध्यमातून मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाईल असे अश्वासन परिवर्तन संस्थेच्या वतीने अहमदपुरात पार पडलेल्या एकल,विधवा, परित्यक्ता महिलांच्या उद्योजकता कार्यशाळेत उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना दिले. अहमदपुर येथील परिवर्तन संस्थेच्या सभागृहात एकल,विधवा,परित्यक्ता महिलांची तालुका स्तरीय एक दिवशीय उद्योजकता कार्यशाळा घेण्यात आली.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी संस्था सचिव बालाजी शिंदे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जनविकास संस्थेचे नागनाथ चव्हाण,विष्णु आचार्य उपस्थित होते.यंत्राच्या माध्यमातुन होत असलेली शेतीची व सरकारी कामे यामुळे मजुरांचा रोजगार दिवसेदिवस कमी होताना दिसत आहे.इतर मजुरां बरोबरच एकल,विधवा,परित्यक्ता महिलांच्या ही हाताला काम मिळत नसल्यामुळे जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.स्वतः बरोबर कुंटूबांची होणारी फरफट थांबावी याकरिता एकल,विधवा,परित्यक्ता महिलांनी दुसरीकडे रोजगार शोधण्या पेक्षा दुध व्यवसाय,कुकूट पालन,गोट फॉर्म,ब्युटी पार्लर, किराणा दुकान,मिरची कांडप,पापड,मसाले, लोनचे असे घरगुती छोटा मोठे उद्योग सुरू करून कुंटूबाचा उदरनिर्वाह चालविली जाऊ शकते या करिता परिवर्तन संस्थेच्या पुढाकारातून शासकिय योजना मिळवून देवून मदत करणार असल्याचे बालाजी शिंदे म्हणाले तर नागनाथ चव्हाण आणि विष्णु आचार्य यांनीही उपस्थित महिलांनी उद्योग क्षेत्रात पुढे येण्याचे अवाहन केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अविनाश शिंदे यांनी केले यावेळी ,वैजनाथ मुसळे,ललिता खलसे, छबुबाई शिंदे,भागवत खलसे,सह तालुक्यातील एकल,विधवा,परित्यक्ता महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आमदार रोहित पवार यांच्या ईडी चौकशीचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हिंगणघाट शहरातर्फे तीव्र निषेध ...

दै.जनप्रभात
तालुका प्रतिनिधी
अमोल झाडे समुद्रपुर

समुद्रपुर:- राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आमदार रोहित पवार यांच्या ईडी मार्फत होणाऱ्या चौकशीच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे केवळ आपल्या मतदारसंघापुरतेच मुद्दे ते मांडत नाहीत तर राज्यातील विविध घटकांचे मुद्दे ते आक्रमकपणे मांडत आहेत. राज्यातील युवांच्या प्रश्नावर नुकतीच त्यांनी पुणे ते नागपूर अशी तब्बल ८०० कि.मी. हून अधिक लांबीची युवा संघर्ष यात्रा काढून त्याकडे सरकारचे लक्ष वेधलेच पण सोबतच शेतकरी, महिला, कामगार, बेरोजगार यांचे मुद्देही आक्रमकपणे मांडले. पक्षातील पहिल्या फळीतील अनेक नेते सत्तेत सहभागी झाले असले तरी आमदार रोहित पवार हे न डगमगता राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या गटाची भूमिका ठामपणे आणि मुद्देसूदपणे मांडत आहेत. यामुळेच घाबरलेल्या सरकारने त्यांच्या मागे आता चौकशीचा ससेमिरा लावला आहे.लोकांचे प्रश्न मांडणाऱ्या या युवा नेत्याला रोखण्यासाठी सरकारकडून सूडाची कारवाई केली जात असून इंडीच्या चौकशीचा ससेमिरा त्यांच्यामागे लावली आहे. लोकशाहीमध्ये लोकांचे प्रश्न मांडणाऱ्या नेत्याविरोधात कारवाई केली जात आहे. यांचा निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी तहसीलदार यांना निवेदन देत निषेध नोंदवला... यावेळी



प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात निवेदन देऊन तीव्र निषेध नोंदविण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एक गट फुटून सरकारमध्ये सामील झाला असला तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे असंख्य कार्यकर्ते आणि पदाधिकारी हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासोबत लढत आहेत आणि त्यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे आमदार रोहित पवार हे आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर निष्ठा ठेवून त्यांनी फुटीर गटाविरोधात राज्यभरात रान पेटवले आहे आणि राज्यातील सामान्य नागरीक, विद्यार्थी, युवा, शेतकरी, महिला यांच्या मुद्यांवरही ते सरकारला कोंडीत पकडण्याचे काम करत आहेत.

आनंद भाऊ देवकते यांची भाजपा शहर उपाध्यक्ष पदी निवड



दै.जनप्रभात
उपसंपादक / लातूर जिल्हा
विष्णू मोहन पोले

लातूर/ अहमदपूर :बालाघाट शासकीय तंत्रनिकेतन कॉलेज येथे गाव चलो अभियान या कार्यक्रमांमध्ये अहमदपूर राजुर शहर फादर बॉडीची कार्यकारणीची निवड करण्यात आली या निवडीत शहर उपाध्यक्ष म्हणून आनंद शिवाजी देवकते याची निवड करण्यात आली या निवडीचे पत्र देते वेळेस अहमदपूर विधानसभा प्रमुख तथा प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील. लोकसभा प्रमुख माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल भैया केंद्रे गाव चलो अभियानाचे प्रमुख भारत भाऊ चामे जिल्हा विस्तारक सिद्धेश्वर पवार विधानसभा विस्तारक चंद्रशेखर डांगे ओबीसी चे प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानोबा बडगिरे भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते राजाभाऊ मजगे पंचायत समितीचे माजी सभापती बालासाहेब गुट्टे . जिल्हा उपाध्यक्ष ओम भाऊ पुणे.भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष प्रताप पाटील शहर अध्यक्ष सुशांत गुणाले तसेच नाथराव तात्या केंद्रे व माणिक नरवटे. हणमंत देवकते परमेश्वर पाटील. जमालपुरे. रामनाथ पलमटे. दत्ता खंदाडे. जयश्री ताई केंद्रे.तसेच ग्रामीण भागातील सर्व वारियर इत्यादी सर्व भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते आणि नेतेमंडळी उपस्थित होती

निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीची सौ.शर्मिलाताई राजसाहेब ठाकरे यांच्यासोबत चर्चा

प्रतिनीधी/ धनराज पवार

आर्णी :- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापकीय अध्यक्ष श्री. मा. राजसाहेब ठाकरे यांच्या पत्नी सौ.शर्मिलाताई ठाकरे हया १ फेब्रुवारी रोजी वणी येथील दौऱ्यावर असताना मनसेचे यवतमाळ जिल्ह्याचे नेते आनंदभाऊ ऐंबडवार , राजूभाऊ उंबरकर , अनिलभाऊ हमदापुरे, देवा भाऊ यांच्या पुढाकाराने निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाची भेट मनसेचे नेते राजूभाऊ उंबरकर यांच्या निवासस्थानी झाली. यावेळी यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा धरण विरोधी संघर्ष समितीचे प्रसिद्धी प्रमुख व संघटक सचिव श्री. मुबारक तंवर यांच्या नेतृत्वात धरण विरोधी समितीच्या शिष्टमंडळाने निम्न पैनगंगा प्रकल्पाबाबतचे निवेदन सौ. शर्मिलाताई राजसाहेब ठाकरे यांना दिले, शिष्टमंडळासोबत पैनगंगा प्रकल्पाबाबत चर्चा केली आणि पुढील काही दिवसात मा. राजसाहेब ठाकरे यांची धरण विरोधी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाची भेट घालून देण्याची विनंती केली असता, सौ.शर्मिलाताई राजसाहेब ठाकरे यांनी सुद्धा धरण विरोधी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळासोबत राज साहेबांची भेट घालून देणार असल्याचे आश्वासन यावेळी दिले. धरण विरोधी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळात मुबारक तंवर यांच्यासह कवठा (बु.) येथील सरपंच पांडुरंग सिडाम, उपसरपंच अमित ठाकरे , रितेश आत्राम , सचिन जुनगरे हे सहभागी होते.

बोर महोत्सवात ७६ प्रकारच्या बोरांचे प्रदर्शन गिरडच्या गावरान बोरं महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद



दै.जनप्रभात
तालुका प्रतिनिधी / अमोल झाडे

समुद्रपुर:- गावरान मेवा म्हटलं की सगळ्यांना लहानपण आठवते. मात्र नवी पिढी याविषयी अनभिज्ञ आहे. रानमेव्याचे आरोग्य विषयक महत्व समाजात रुजविण्यासाठी गिरड येथे गावरान बोरं महोत्सवाचे आयोजन वेधक ठरले. या बोर महोत्सवात ३६ शेतकरी, महिलांनी ७६ प्रकारच्या बोर प्रदर्शनीत प्रदर्शीत केले होते.तर परिसरातील महिलांनी बोरापासून तयार केलेली व्यंजने अनेकांनी चाखून गोळी अनुभवली.विद्यार्थ्यांसाठी बोरं महोत्सवाचे आकर्षण ठरले. समुद्रपुर तालुक्यातील गिरड येथील मगन संग्रहालयाच्या नैसर्गिक शेती विकास केंद्रात **पान २ वर**

प्रशांत पवार आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित

शिक्षक आमदार सुधाकर अडबाले माजी मंत्री सुनील केदार यांच्या उपस्थितीत पारशिवणी येथे सन्मान सोहळा संपन्न .ममाजी शिक्षक संघटनेकडून पुरस्कार वितरणाचे आयोजन





दै.जनप्रभात
काटोल/गौरव मानकर

रोख ठोक व्यक्तिमत्व व विद्रोही पत्रकार म्हणून पंचक्रोशीत सुपरीक्षक सुपरीचीत असलेले प्रशांत पवार यांना नुकताच माजी शिक्षक संघटने कडून उत्कृष्ट पत्रकार म्हणून गौरविण्यात आले पवार यांनी आपल्या बारा वर्षाच्या पत्रकारितेत अनेक सामाजिक विषय हाताळले शेतकरी कष्टकरी शेतमजूर यांच्या विषयाला न्याय कसा मिळेल याकडे विशेष लक्ष देऊन आपल्या लेखणीतून त्यांनी अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले कंत्राटी कर्मचाऱ्यांचे सुद्धा विषय त्यांनी पत्रकारितेतून मांडले पांदण रस्ते कलम १४३ महसूल विभागातील भ्रष्टाचार शेतकऱ्यांच्या मालाला भाव नसणे शेतकऱ्यांवर येणारी नैसर्गिक आपत्ती त्यामुळे होणारी पिकाची नासाडी जंगली जनावरापासून शेतकऱ्यांना होणारा त्रास स्पर्धात्मक परीक्षेत बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा विषय अशा इथंबूत बाबींवर प्रकाश टाकून समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारितेतून प्रशांत पवार यांनी सतत प्रयत्न केले या बाबींची दखल माजी शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य यांनी घेऊन पारशिवणी येथील तकया मारोती देवस्थान येथे प्रशांत पवार यांना पाहुण्यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. पवार यांनी माजी शिक्षक संघटनेचे अशोकराव दगडे , दिपक सावळकर सुनील मोहोड सुधीर बुटे यांचे विशेष आभार मानले. पुरस्कार वितरण कार्यक्रमाला आमदार सुधाकर अडबाले माजी मंत्री सुनील केदार माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रश्मीताई बर्वे जिल्हा परिषद उपाध्यक्ष कुंदाताई राऊत जिल्हा परिषद सदस्य अर्चनाताई भोयर पारशिवानी सभापती उपसभापती पराट गुरुजी शिक्षक सभापती कुसूंबे उपस्थित होते.

सहशिक्षक श्री दत्तात्रय टिपरे यांनी कोठारबन शाळेतील २०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा केला ...

दै.जनप्रभात
बीड / गितांजली



लव्हाळे :- जिल्हा परिषद कोठारबन ता वडवणी जी बीड शाळेतील सहशिक्षक श्री दत्तात्रय टिपरे सर यांनी आपला वाढदिवस शाळेतील सर्व विद्यार्थींना शालेय साहित्य वाटप व चौकलेट व केक वाटप करून त्यांच्या सोबत साजरा केला उपस्थित मार्गदर्शक श्री बाबासाहेब उजगरे साहेब गटशिक्षणाधिकारी प स वडवणी श्री सैलानी शेख, श्री ज्ञानेश्वर वाव्हळ,श्री सुनीलभाऊ मुंडे साहेब केंद्रप्रमुख श्री तिडके पी एल, श्री धाईतिडक रमेश, श्रीमती जाधवर प्रभावती मॅडम, श्रीमती धस मॅडम,श्री भस्करे जालिंदर, श्री अशोक जाधव,श्री दासरे श्यामसुंदर, श्री गणेश राठोड, श्री प्रकाश कुरकुटे, श्री उद्धव बडे, श्री गोरख मुंडे, श्री बंडू नागरगोजे,श्री शिंदे सर, भगवान खटावकर, सचिन कदम यांनी वाढदिवस साजरा करून शुभेच्छा दिल्या ते नेहमीच, सतत सामाजिक शैक्षणिक कार्यात अग्रेसर असतात ते नेहमीच विद्यार्थ्यांन साठी विविध उपक्रम राबवत असतात त्याच बरोबर सामजिक कार्यात पण ते नेहमी सक्रीय असतात त्यांचा वडवणी पंचक्रोशित खूप मोठा मित्र परिवार असुन त्यांनी अल्प वयातच खूप मोठी आपल्या कुशल, हसतमुख , दानशूर,प्रेमळ,स्वभाव, दातृत्व ने वडवणी तच नव्हे तर संपुर्ण बीड जिल्हयात च ओळख निर्माण केली आहे त्यामुळे त्यांचा विविध ठिकाणी मित्र बांधवांनी, वर्गमित्र, शिक्षक बांधव अधिकारी व्यापारी, प्रतिष्ठित व्यापारी, नातेवाईक ,गावातील नागरीकना नी वाढदिवस साजरा करून त्यांच्यावर शुभेच्या चा वर्षाव करण्यात आला.

संपादकीय .....

'प्रशासकराज' चा अर्थसंकल्प!

केंद्रीय अर्थसंकल्पापाठोपाठ शुक्रवारी मुंबई महापालिकेचा सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आयुक्त तथा प्रशासक इकबाल सिंह चहल यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आला. मुंबई महापालिकेच्या २०२४-२५च्या अर्थसंकल्पात ५९ हजार ९५४ कोटी रुपयांची, तर शिक्षणासाठी यंदा ३१६७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यावेळच्या अर्थसंकल्पात महिला सक्षमीकरण, आरोग्य, पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि प्रदूषण नियंत्रण यावर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे.तसेच भांडवली खर्च वाढवणे आणि महसुली खर्च कमी करणे यावरही यंदाच्या अर्थसंकल्पात लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. गुरुवारी देशाचा अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कुठल्याही लोकप्रिय घोषणा करण्याचे टाळले. यामागचे कारण म्हणजे अर्थमंत्री सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प अंतरिम अर्थसंकल्प होता. मोदी सरकारच्या दुसर्या कार्यकाळातील हा शेवटचा अर्थसंकल्प होता. पुढच्या २ महिन्यांत लोकसभेच्या निवडणुका होणे अपेक्षित आहे.

या निवडणुकीनंतर केंद्रात सत्तेत येणारे नवे सरकार जून-जुलैमधील पावसाळी अधिवेशनात २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा पूर्ण अर्थसंकल्प सादर करेल. ही जबाबदारीही आपल्याच सरकारची असल्याच्या अविर्भावात विरोधकांच्या टीका टिप्पणीला न जुमानता निर्मला सीतारामन यांनी अतिशय शांत आणि स्थितप्रज्ञ राहून हा अर्थसंकल्प सादर केला. सर्वसामान्य, नोकरदार, शेतकरी या वर्गांना चुकूनही धक्का न लावण्याचे केंद्राचे धोरण या अर्थसंकल्पात दिसले. त्यामुळेच प्राप्तिकर रचनेचे स्लॅब ना कमी ना जास्त करीत आहे तसेच ठेवण्यात आले.

आपल्या अर्थसंकल्पात निर्मला सीतारामन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने मागील १० वर्षांमध्ये केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला. सरकारी योजनांतून शेतकरी, युवावर्ग, महिला, गरिबांना किती फायदा झाला याची आकडेवारी सादर करण्यात आली. या योजनांच्या विस्तारिकरणाचे आश्वासन देण्यात आले. मोदी सरकारने मागील १० वर्षांत जी काही ध्येय धोरणे आखली, विकासाचा पाया रचला त्याआधारे २०४७ पर्यंत भारत एक विकसित देश म्हणून नावारूपाला येईल, असे आश्वासनही अर्थमंत्र्यांनी देशवासीयांना दिले.

लोकसभेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. मुंबई महापालिकेवर सध्या प्रशासकराज आहे. एका अर्थाने मुंबई महापालिका राज्य सरकारच्या नियंत्रणात आहे. त्यामुळे तमाम मुंबईकरांचे लक्ष या अर्थसंकल्पाकडे लागले होते. अपेक्षेनुसार मुंबईकरांवर करवाढीचे कुठलेही ओझे टाकण्यात आले नाही. महापालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख ५ स्त्रोत आहेत. जकात हा महापालिकेचा उत्पन्नाचा सर्वात मोठा स्त्रोत बंद झाल्यापासून महापालिकेला जीएसटीच्या नुकसानभरपाईवर अवलंबून राहावे लागते.यावर्षी महापालिकेला १३ हजार कोटींची जीएसटीची नुकसानभरपाई मिळणार आहे. त्याशिवाय मालमत्ता करातून महापालिकेला साधारणत: ५ ते ६ हजार कोटी आणि बांधकामाच्या अधिमूल्यातून साधारणत: ३ हजार कोटी उत्पन्न मिळते. कुठलीही करवाढ न झाल्याने हे उत्पन्न तेवढेच राहील. महापालिकेला बँकांतील मुदत ठेवींच्या व्याजातूनही उत्पन्न मिळते. दुर्दैवाने महापालिकेला उत्पन्नाचे नवीन स्त्रोत शोधण्यात अद्यापही यश आलेले नाही. याउलट गेल्या अर्थसंकल्पात मुदत ठेवी फोडून विकासकामांवर पैसा खर्च करण्यात आला होता.

गेल्या वर्षी ९२ हजार कोटी रुपयांच्या ठेवी आता ८४ हजार कोटी रुपयांवर घसरल्या आहेत. थोडक्यात ८ हजार कोटींच्या ठेवी तोडण्यात आल्या. राज्यात महायुतीची सत्ता आल्यापासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: रस्त्यावर उतरून मुंबई डीप क्लीन करीत आहेत. गेल्या काही वर्षांत मुंबईत वाढलेले प्रदूषणही मुंबईकरांच्या चिंतेचा विषय ठरला आहे. शिक्षण, आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन, पाणी पुरवठा ही मुंबई महापालिकेची मूलभूत कर्तव्ये असली तरी यापलीकडे जाऊन गेल्या काही वर्षांत महापालिकेने पायाभूत सुविधा विकासाचे मोठमोठे प्रकल्प हाती घेतले आहेत.

सागरी किनारा मार्ग, गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता, समुद्राच्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्याचा प्रकल्प अशा प्रकल्पांचा भांडवली खर्च मोठा आहे. त्यातील अनेक प्रकल्प एकतर अपूर्ण आहेत किंवा वर्षानुवर्षे लटकलेले आहेत. त्यात मुंबईचे सुशोभीकरण, रस्त्यांचे सिमेंटीकरण अशा मुख्यमंत्र्यांच्या ड्रीम प्रोजेक्टचीही भर पडलेली आहे. अशा सर्व पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद केलेली आहे. शिक्षण खात्याच्या अर्थसंकल्पात १५० कोटींनी वाढ करीत दर्जेदार डिजिटल शिक्षणावर भर दिलेला आहे.

आरोग्य सुविधांसाठीही ७,१९१ कोटींचा निधी दिला आहे. अर्थसंकल्पात सर्वसामान्यांच्या आशा-अपेक्षांचे प्रतिबिंब उमटावे असे अपेक्षित असते, परंतु निवडणुका न झाल्याने मार्च २०२२पासून मुंबई महापालिकेने लोकप्रतिनिधींचा चेहराच बघितलेला नाही. महापालिकेतील आपल्या दालनात बसून मुंबईचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा एकटेच मुंबई महापालिकेतील २८८ नगरसेवकांची जागा भरून काढत आहेत. त्याचाच परिपाक म्हणून की काय मुंबईतील विविध पक्षांच्या ३६ आमदारांपैकी केवळ सत्ताधारी आमदारांना प्रत्येकी ३५ कोटी रुपयांच्या विकास निधीचे वाटप करण्यात आले.

यावरून बराच गदारोळ झाला. कदाचित डावलण्यात आलेल्या १५ आमदारांच्या मतदारसंघांमध्ये मुंबईकर राहत नसावेत किंवा सत्ताधार्यांना मतदान करीत नसावेत असा त्यांचा समज झाला असावा. प्रशासक इकबाल चहल यांनी सलग दुसर्यांदा महापालिकेचा अर्थसंकल्प सादर केला. लोकप्रतिनिधींच्या गैरहजेरीत सादर झालेल्या या प्रशासकीय अर्थसंकल्पातून नेमके मुंबईकरांचे समाधान झाले की सत्ताधार्यांचे हे कळायला मार्ग नाही.

उभे जागोजागी बंड: गोरे सरकार थंड थंड!

आद्यक्रांतिवीर उमाजीराजे नाईक बलिदान दिन सप्ताह.

दै.जनप्रभात

क्रांतिकारकांचा आदर आणि त्यांचे स्मरण सर्वच जातिधर्मातील लोकांनी केले पाहिजे. मग हे राजे उमाजी नाईक असे उपेक्षितच का राहून गेले? हे आश्चर्य आहे. अशा या धाडसी उमाजीराजेंनंतर तब्बल १३ वर्षांनी– सन १८४५ला क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके जन्माला आले. त्यांनी उमाराजेंचे धोरण डोळ्यासमोर ठेवत ३०० रामोशांना सोबत घेऊन बंड सुरू केले. त्यावेळी दौलती रामोशी हा त्या बंडाचा सेनापती होता. नरवीर उमाजीराजे स्वत:च्या कार्याने एक दीपस्तंभ ठरले आहेत. त्यांचा गौरव करण्यापासून इंग्रज अधिकारीही स्वत:ला रोखू शकले नाहीत. इंग्रज अधिकारी कॅप्टन रॉबर्टसन याने १८२०ला ईस्ट इंडिया कंपनीला लिहिताना म्हटले, ''उमाजीचा रामोशी समाज इंग्रजांविरुद्ध तिरस्काराने पेटला असून तो कोणत्या तरी राजकीय बदलाची वाट पाहत आहे. जनता त्यांना मदत करत असून कोणी सांगावे, हा उमाजी राजा होऊन छ. शिवाजीसारखे राज्य तर स्थापणार नाही ना?'' तर मॉकिनटॉस म्हणतो, ''उमाजीपुढे छ.शिवरायांचा आदर्श होता. त्याला फाशी दिली नसती तर तो दुसरा शिवाजी झाला असता.'' हे केवळ गौरवोद्गार नसून हे सत्य आहे... जर इंग्रजांनी कूटनीती आखली नसती तर कदाचित तेव्हाच भारताला स्वातंत्र्य मिळाले असते. भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत. काहींची नोंद झाली, काहींची दखलच घेण्यात आली नाही. सन १८५७च्या उठावापूर्वीही अनेक उठाव झाले. अशाच पहिल्या उठावाडरे इंग्रजांना सलग १४ वर्षे सळो की पळो करून सोडणारे व सर्व प्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारे महाराष्ट्रातील निधड्या छातीचे वीर आद्यक्रांतिकारक नरवीर ठरले गेले. ज्यांना इंग्रजांचा कर्दनकाळ म्हणूनही ओळखले जाते. ते म्हणजे राजे उमाजी नाईक!

नरवीर उमाजीराजे नाईक-खोमणे यांचा जन्म रामोशी-बेरड समाजात लक्ष्मीबाई व दादोजी खोमणे यांच्या पोटी दि.७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील किल्ले पुरंदर येथे झाला. वडिल दादोजी खोमणे पुरंदर किल्ल्याचे वतनदार होते. त्यामुळे उमाजीराजेंचे कुटुंब पुरंदर व वज्रगड किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत होते. त्यामुळेच त्यांना नाईक ही पदवी मिळाली होती. उमाजीराजे जन्मापासूनच हुशार, चंचल, शरीराने धडधाकट, उंचपुरे आणि करारी होते. त्यांनी पारंपरिक रामोशी हेर कला लवकरच आत्मसात केली. जसे राजे मोठे होत गेले, तसे त्यांनी वडीलांकडून दांडपट्टा, तलवार, भाला, कुऱ्हाड, तीरकमठा, गोफण वगैरे चालवण्याची कला अवगत केली. या काळात इंग्रजांनी भारतात आपली सत्ता स्थापन करण्यास सुरूवात केली होती. हळूहळू मराठी मुलुख जिंकत त्यांनी पुणे ताब्यात घेतले. इ.स.१८०३मध्ये पुण्यात दुसऱ्या बाजीराव पेशव्यास स्थानापन्न केले आणि त्याने इंग्रजांचा पाल्य म्हणून काम सुरू केले. सर्वप्रथम त्याने इतर सर्व किल्ल्यांप्रमाणे पुरंदर किल्ल्याच्या वतनदारीचे व संरक्षणाचे काम रामोशी समाजाकडून काढून घेऊन आपल्या मर्जीतील लोकांकडे दिले. त्यामुळे रामोशी समाजावर उपासमारीची वेळ आली. जनतेवर इंग्रजी अत्याचार वाढू लागले. अशा परिस्थितीत करारी उमाजीराजे बेभान झाले. छत्रपती शिवरायांना श्रद्धास्फूर्तीचे स्थान देत त्यांचा आदर्श घेतला. स्वत:च्या अधिपत्याखाली स्वराज्याचा पुकार करत आपल्या देशावर परकीयांना राज्य करू देणार नाही, असा पण केला. विठोजी नाईक, कृष्ण नाईक, खुशाबा रामोशी, बाबू सोळस्कर यांना बरोबर घेऊन कुलदैवत जेजुरीच्या श्री खंडोबारायाला भंडारा उधळत शपथ घेतली व इंग्रजांविरोधात पहिल्या बंडाची गर्जना केली.

उमाजीराजे नाईक यांनी इंग्रज, सावकार, मोठे वतनदार अशा लोकांना लुटून गोरगरिबांना आर्थिक मदत करण्यास सुरवात केली. कोणत्याही स्त्रीवर अत्याचार- अन्याय झाल्यास ते भावासारखे धावून जाऊ लागले. इंग्रजांना त्रास दिल्यामुळे त्यांना सरकारने इ.स.१८१८मध्ये एक वर्ष तुरुंगवासाची शिक्षा दिली. परंतु तो काळ सत्कारणी लावत ते तुरुंगातच लिहिणे-वाचणे शिकले. या घटनेचे इंग्रज आधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस याने फार आश्चर्य व कौतुक केले. तुरूंगातून सुटल्यानंतर इंग्रजांविरुद्ध त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. ते देशासाठी लढत असल्याने जनताही त्यांना साथ देऊ लागली. त्यामुळे इंग्रज मेटाकुटीला आले. त्यांना पकडण्यासाठी इंग्रज अधिकारी मॉकिनटॉस याने सासवड-पुरंदरच्या मामलेदारास फर्मान सोडले. मामलेदार इंग्रजी सैन्य घेऊन पुरंदरच्या पश्चिमेकडील एका खेड्यात गेला असता, तेथे त्यांच्यात आणि उमाजीराजेंच्या सैन्यात तुंबळ युद्ध झाले. यात इंग्रजांना पराभव स्वीकारावा लागला. उमाजीराजेंचे सैन्य डोंगरात टोळ्या करून राहत असत. एका सैन्य तुकडीत जवळजवळ ५ हजार सैनिक होते.

इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रुशी मुकाबला करायचा म्हणजे मोठे मनुष्यबळ असायला हवे. म्हणजेच सैन्य व प्रचंड खर्च आलाच. पण उद्देश महान असल्यामुळे ते साधनाअभावी थांबले नाहीत. ते छ. शिवाजी महाराजांना आदर्श मानत. असे खुद्द इंग्रज आधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस याने नमूद केले आहे. दि.२४ फेब्रुवारी १८२४ला नरवीर उमाजीनी भाबुड्री येथील इंग्रज खजिना लुटून तो देवळाच्या देखभालीसाठी जनतेला वाटला होता. दि.२२ जुलै १८२६ साली त्यांचा राज्याभिषेक कडेपठार, जेजुरी या ठिकाणी करण्यात आला. त्यांनी छत्रचामर, अबदागीर, इ.राजचिन्हे धारण केली. दरबारात ते भिक्षुक-पुजारी यांना दक्षिणा व गोरगरिबांना दान देत असत. त्यांनी विभागनिहाय सैन्य प्रमुख व त्यांच्या तुकड्या नेमून सर्व भागात त्या तैनात केल्या होत्या. त्यांना कामे वाटून दिली होती. तसेच त्यांनी एकमेकांशी संपर्क, दळणवळण, इंग्रजांच्या बातम्या तसेच लोकांचा बातम्या, इ.कामासाठी हेरखातेही निर्माण केले होते. विभागनिहाय गुप्तहेरखाते नेमले होते. सैन्यात व गुप्तहेरखात्यात सर्व जाती-धर्माचे लोक होते. त्याच साली २८ ऑक्टोबरला त्यांच्याविरुद्ध इंग्रजांनी पहिला जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यात उमाजीराजे व त्यांचा साथीदारांना पकडणाऱ्यास मोठ्या रकमेची बक्षिसे व इनाम जाहिर केले. या क्रांतिकारकांना मदत करणाऱ्यास शिक्षाही जाहीर केली. पण जनतेने इंग्रजांना मदत केली नाही. यातून उमाजीराजेंची लोकप्रियता दिसून येते. अशाच प्रकारे दुसरा जाहिरनामा इंग्रजांनी दि.८ ऑगस्ट १८२७ साली प्रसिद्ध केला. त्यात बक्षिसाची रक्कम वाढवली व शरण येणाऱ्यास माफी देण्याचे अभिवचन देण्यात आले. तरीही कोणी मदत केली नाही. कारण लोक उमाजीराजेंना इंग्रजांविरुद्ध एक आशास्थान म्हणून पाहू लागले होते. पुढे २० डिसेंबरला झालेल्या युद्धात इंग्रजांना पराभव पत्करावा लागला. उमाजीराजेंनी ५ इंग्रज सैनिकांची मुंडकी कापून मामलेदाराकडे खलिता म्हणून पाठवली. त्यामुळे इंग्रज चांगलेच धास्तावले. कैप्टन डेव्हिसपासून लेफ्टनंटपर्यंत सर्वच लालबुंद झाले. नंतर ३० नोव्हेंबरला इंग्रजांना त्यांनी ठणकावून सांगितले की, आज हे एक बंड असले तरी असे हजारो बंड सातपुड्यापासून सह्याद्रीपर्यंत उठतील व तुम्हास जेरीस आणतील. फक्त इशारा देऊन न थांबता त्यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. इंग्रजांनी तिसरा जाहिरनामा प्रसिद्ध करून बक्षिसाची रक्कम दुप्पट केली. त्याचाही काही उपयोग झाला नाही. जंजिऱ्याचा सिद्दी नवाबने उमाजीराजे कोकणात गेले असताना त्यांना मदत मागितली होती. दि.२४ डिसेंबर १८३०ला त्यांनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्यावर मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवत घायाळ करून परत पाठवले होते. त्यात काहींचे प्राणही घेतले. दि.२६ जानेवारी १८३१ साली इंग्रजांनी चौथा जाहिरनामा प्रसिद्ध केला, की त्यांना पकडून देणाऱ्यास ५००० रुपये रोख बक्षिस व २०० बिघे- १०० एकर जमीन जाहिर करण्यात आली. पण तरीही कोणीही इंग्रजांना मदत केली नाही. अशा प्रकारे त्यांच्या भारताच्या स्वातंत्र्यलढ्यास सर्व राजे-रजवाडे, संस्थानिक, जनता पाठिंबा देत होते. उमाजीराजेंनी दि.१६ फेब्रुवारी १८३१ रोजी इंग्रजी सत्तेविरुद्ध एक जाहीरनामाच प्रसिद्ध केला. त्यात नमूद केले होते, की लोकांनी इंग्रजी नोकऱ्या सोडाव्यात. सर्व राजे-रजवाडे, सरदार, जमीनदार, वतनदार, देशवासीयांनी एकाच वेळी एकत्र येऊन जागोजागी बंड पुकारावे आणि इंग्रजांविरुद्ध अराजकता माजवावी. इंग्रजांचे खजिने लुटावेत. इंग्रजांना शेतसारा, पट्टी देऊ नये. असे करणाऱ्यास नवीन सरकारमधून जहागिरी, इनामे वा रोख पैशाची बक्षीसे मिळतील. ज्यांची वंशपरंपरागत वतने, तनखे इंग्रज सरकारमुळे गेले असतील ती सर्व त्यांना परत केली जातील. इंग्रजांची राजवट आता लवकरच संपुष्टात येणार आहे व नवीन न्यायाधिष्ठीत राज्याची स्थापना होइल. इंग्रजांना कोणीही मदत करू नये. तसे केल्यास नवीन सरकार त्यांना शासन करेल, असे सांगून उमाजीराजेंनी एकप्रकारे स्वराज्याचा पुकारच केला होता. संपूर्ण क्रांतिकारकांच्या इतिहासात अशा प्रकारचा व्यापक जाहिरनामा प्रथमच दिसतो. हे भारताच्या इतिहासातील सोनेरी पानच आहे. म्हणूनच उमाजीराजे हे आद्यक्रांतिकारक ठरतात. तेंव्हापासून उमाजी हे जनतेचे राजे बनले. या सर्व प्रकारामुळे इंग्रज गडबडले आणि त्यांनी उमाजीराजेंना पकडण्यासाठी युक्तीचा वापर केला. सावकार, वतनदार यांना मोठमोठी आमिषे दाखवण्यात आली . इंग्रजांनी उमाजीराजेंविरुद्ध पाचवा जाहिरनामा प्रसिद्ध केला. माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये रोख आणि चारशे बिघे जमीन बक्षीस देण्याची घोषणा केली. हा इनाम त्या काळात अगनित होता. देशद्रोही त्र्यंबक चंद्रस कुलकर्णी हा फितूर होऊन उमाजींराजेंची सर्व गुप्त माहिती इंग्रजांना दिली. दि.१५ डिसेंबर रोजी भोर तालुक्यातील उतरोली या गावी रात्री बेसावध असताना त्यांना इंग्रजांनी पकडले. पुण्यात मामलेदार कचेरीतील एका काळ्या खोलीत त्यांना ३५ दिवस ठेवण्यात आले. अशा या खोलीत ते असताना त्यांना पकडणारा इंग्रज अधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस दररोज त्यांची माहिती घेत होता. त्यानेच उमाजीराजेंची सर्व हकीकत लिहून ठेवली आहे. उमाजीराजेंवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला आणि या नरवीरांना न्यायाधीश जेम्स टेलर यांनी दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली. देशासाठी बलिदान देणारे पहिले नरवीर उमाजीराजे नाईक दि.३ फेब्रुवारी १८३२ला पुण्याच्या खडकमाळ आळी येथील मामलेदार कचेरीत वयाच्या ४३व्या वर्षी हसत हसत फासावर चढले. जीवंतपणी सतत ताठ राहिलेली मान जीव गेल्यानंतरच वाकली. इतरांना दहशत बसावी म्हणून त्यांचे प्रेत कचेरीच्या बाहेर पिंपळाच्या झाडाला तीन दिवस लटकवून ठेवले होते. उमाजीराजेंसोबत इंग्रजांनी त्यांचे साथीदार खुशाबा नाईक आणि बापू सोळस्कर यांनाही फाशी दिली. !! त्यांच्या अचाट देशभक्तीपर स्मृतींना संपूर्ण सप्ताहभर मानाचा लवून मुजरा !!

क्रांतिवीर राजे उमाजी नाईक हे भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध लढणारे महाराष्ट्रातील प्रथम आद्यक्रांतिकारक होते. आज ३ फेब्रुवारी हा या महान आद्यक्रांतिकाराचा स्मृतिदिन. रामोशी-बेरड समाजाशिवाय कोणाच्याच नेहमीप्रमाणे तो लक्षात राहत नाही. त्यामुळे राजे उमाजी नाईक फक्त रामोशी-बेरड समाजापुरते मर्यादित असल्यासारखे होत आहे. पण सर्व जाती-धर्मांनी हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ही आठवण करून देणारा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा संकलित लेख...

संपादक.

==========

– संकलन व सुलेखन –
श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
(मराठी व हिंदी साहित्यकार)
मु. पो. ता. जि. गडचिरोली
फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.

मधुमेह ..

साखर बनते कडू
सतावतो मधुमेह
शिवशिवतातओठ
खुणावतो मधू मोह

गोड पदार्थ दिसता
जीभ करते विद्रोह
वश करते पोटाला
सोडते अस्त्र संमोह

आजचं फक्त खावू
केला जातो तो तह
तह हयात ना गोड
करतो पुन्हा निग्रह

नेमके का कुणीतरी
करती फार आग्रह
गोड प्रेमळ माणसे
मजवर करे अनुग्रह

मधुमेहा सहीत होई
कैक रोगांचा संग्रह
एकटा नसतो काही
व्याधींचा रे परिग्रह

इन्शुलीन साथ देतो
करता लढाई विग्रह
माधुर्याशी माझा का
असह्य सदैव विरह

– हेमंत मुसरीफ, पुणे

==========

क्लेप्टामेनिया ..

चोरी करण्यामागे
कारणे ती हजार
कधी कुणां जडतो
मानसिक आजार

दिसे वस्तु बेवारस
चोरायचे ये विचार
सेरोटॉनीनचे स्त्राव
रक्तात करी संचार

शिवशिवू लागे हात
मना उपळे विकार
नकळत घडते सारे
चौर्य कर्म अविचार

चोरी करत असता
आनंद मिळे अपार
कशी का करे चोरी
विस्मरण नंतर पार

समजून घ्या रोग्यां
करा मानसोपचार
नको उगा हेटाळणी
महाग पडे धुत्कार

गंडे दोरे बांधू नका
नकोढोंगी चमत्कार
नको शिक्षा ताडण
अंधश्रध्दासोपस्कार

संयमाने हाताळावे
द्यावा संपूर्ण आधार
सखोल भले निदान
जो शास्त्रीय आधार

हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६
www.kavyakusum.com

आमदार व जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला 'जाणता राजा'च्या तयारीचा आढावा

दै.जनप्रभात
वर्धा, (जिमाका) :

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय व जिल्हा प्रशासनाच्यावतीने शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित 'जाणता राजा' महानाटयाचा प्रयोग होणार आहे. दि. ६ ते ८ फेब्रुवारी या कालवाधीत स्वावलंबी मैदान, रामनगर येथे आयोजित महानाट्याच्या तयारीला वेग आला आहे. महानाट्याच्या तयारीचा आमदार पंकज भोयर व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयात या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, तहसीलदार रमेश कोळपे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.'जाणता राजा' महानाट्यात प्रवेश निशुल्क असल्यामुळे नागरिकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता सुक्ष्म नियोजन करण्यात यावे. दिव्यांग बांधवांसाठी बसण्याची विशेष व्यवस्था करण्यात यावी. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पार्किंगचे पोलिस विभागाने नियोजन करावे. कार्यक्रमामध्ये स्वयंसेवक, होमगार्ड आदींची मदत घ्यावी, अशा सूचना यावेळी आमदार पंकज भोयर यांनी दिल्या. तीन दिवशीय महानाट्याचे उद्घाटन दि.६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० स्वावलंबी विद्यालय मैदान, रामनगर येथे होईल. उद्घाटन कार्यक्रमास पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, खा.रामदास तडस, आ.रामदास आंबटकर, आ.अभिजित वंजारी, आ.सुधाकर आडबाले, आ.रणजित कांबळे, आ.दादाराव केचे, आ.समीर कुणावार, आ. डॉ. पंकज भोयर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले उपस्थित राहणार आहे. शिवछत्रपतींच्या जन्मापासून राज्याभिषेकापर्यंतच्या रोमांचकारी प्रसंग 'जाणता राजा ' मध्ये दाखविण्यात येणार आहे. दररोज सायंकाळी ५.३० वाजता नंतर या प्रयोगाला सुरुवात होईल. नागरिकांना प्रवेश मोफत असून प्रवेशिकेडरे प्रवेश मिळणार आहे. प्रवेशिका नवीन जिल्हाधिकारी कार्यालय तसेच नगर परिषद कार्यालयामध्ये मिळणार आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच नागरिकांनी सहकुटुंब प्रयोग बघावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



****

बोर महोत्सवात ७६ प्रकारच्या बोरांचे प्रदर्शन
गिरडच्या गावरान बोरं महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

पान १ वरुन २ फेब्रुवारीला गावरान बोर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या बोरं महोत्सवाचे उद्घाटन गिरड ग्रामपंचायतीचे सरपंच राजु नौकरकर,मगन संग्रहालयाच्या अध्यक्षा डॉ विभाताई गुप्ता, माजी जिल्हा परिषद सदस्य फकीरा, दिनकराव गिरडे, सुष्मिताताई दुबे, सामाजिक कार्यकर्ते बबनराव दाबणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. बोरं उत्सावाची सुरुवात प्रा. अभिजित डाखोरे यांनी रानबोरावर लिखित कविता सादरीकरनातून करून बोरांचे आरोग्य विषयक महत्व विषद केले. गिरड परिसरातील शाळेतील १३५ विद्यार्थ्यांनी गावरान विषयावर निबंध सादर केले होते.यातील पूर्वा भिसेकर या विद्यार्थ्यांनी निंबध वाचन सादर केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी गावरान बोराचे वैशिष्ट्य,व मानवी जीवनात महत्त्व निषद केले तसेच मनुष्याच्या आरोग्य गावरान बोर हे औषधीचे काम करते याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.कवी रंगनाथ तालवटकर यांनी कवितेच्या माध्यमातून रानमेव्याचे महत्व विषद केले. या गावरान बोर महोत्सवात बोर प्रदर्शनी, चर्चासत्र, मार्गदर्शन, संवाद, अनुभव कथन, पाककृती आदी विषयावर मंथन करण्यात आले,'गावरान बोर महोत्सव' या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर करून विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आला. गिरड परिसरात गावरान फळांची विविधता निकोप, निरामय आरोग्याला चालना देणारी आहे. ही रानमेव्याची समृद्धी आणि समृद्ध वारसा वृद्धींगत करून नव्या पिढीकडे सोपविणे, काळाची गरज आहे. या नव्या पिढीला जागृत करण्यासाठी गावरान बोर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे मगन संग्रहालयाच्या अध्यक्षा डॉ. विभा गुप्ता यांनी सांगितले या महोत्सवात समुद्रपुर तालुक्यासह नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील गावरान बोर व त्यापासून तयार करण्यात आलेल्या विविध पदार्थांचे स्टॉल लावले होते.या महोत्सवात गुरुकुल विद्या निकेतनच्या विद्यार्थानी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.

अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेचा समारोप

पान १ वरुन हिंदुस्थानी उपशास्त्रीय (गायन) कर्नाटकी शास्त्रीय (संगीत) कर्नाटकी उपशास्त्रीय (गायन) पाश्चात्य संगीत (गायन) लोकसंगीत गायन (एकल) आणि लोकसंगीत समूह गायन सादर करण्यात आले. सोबतच संगीत कला प्रकारातील शास्त्रीय नृत्य (एकल) पाश्चात्य संगीत (गायन) लोकसंगीत (एकल) लोकनृत्य समूह सादर केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिवालय जिमखान्याचे उपसभापती तुषार हिरलेकर होते तर कन्व्हेनर प्रदिप खन्ना प्रमुख पाहुणे होते. सहाय्यक स्पर्धा सचिव मंगल नाखवा, मारुती कवालदार, सभापती अनंत शेटे, मानद सचिव अरविंद शेट्टी, मानद खजिनदार सती सोनवणे, मानद सहसचिव सुनील आगरकर व मानद सहसचिव मकरंद गयावळ यांची उपस्थिती होती. प्रदिप खन्ना यांनी विजेत्या स्पर्धकांना शुभेच्छा देतांना स्पर्धेत भाग घेऊन कला सादर करणे महत्वाचे आहे. जय पराजय होतच असतो, असे सांगितले. महाराष्ट्र शासनाचे आभार व्यकत करुन या स्पर्धा म्हणजे भारत दर्शन आहे. विविध राज्यातील स्पर्धकांनी समुहाने गायन व नृत्य सादर करणे हेच या स्पर्धेचे खरे महत्व आहे, असे ते म्हणाले . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मानद सचिव अरविंद शेटे यांनी केले. यावेळी सर्व स्पर्धाचे बक्षिस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यास्पर्धेमध्ये हिंदुस्थानी क्लासिकलमध्ये व्होकल, लाईट क्लासिकल, कारनेटीक क्लासिकल, वेस्टर्न, इन्स्टुमेन्टल म्युझिकमध्ये - कलसिकल, लाईट क्लासिकल, वेस्टर्न, फोल्क सॉगमध्ये सोलो, ग्रुप, लघुनाटयामध्ये बेस्ट एक्टर, एक्ट्रेस, चाईल्ड रोल, बेस्ट प्राडक्शन, बेस्ट शार्ट प्ले, डॉन्समध्ये क्लासिकल सोलो, फोल्क सोलो, वेस्टर्न सोलो व फोल्क डॉन्स ग्रुप आदी स्पर्धेत एकूण ५६५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यापैकी ६६ स्पर्धकांना सुवर्ण, रौप्य व काँस्य पदक व प्रमाणपत्र देण्यात आले.

पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जदारास तीन महिने शिक्षा व दंड

दै.जनप्रभात प्रतिनिधी

नगर : येथील श्री सदुरु ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेकडून कर्जदार विशाल नारायण साबळे याने वाहन कर्ज घेतले होते. थकीत कर्ज फेडी साठी त्याने पतसंस्थेस धनादेश दिला होता. सदर धनादेश पतसंस्थेने त्यांचे खात्यात वटविण्यासाठी भरला असता तो चेक वटला नाही व पतसंस्थेस कर्जाचे पैसे मिळाले नाहीत. म्हणून पतसंस्थेने अहमदनगर येथील चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट यांच्या कोर्टात निगोशिएबल इंस्ट्रूमेंट्स ॲक्ट चे कलम १३८ प्रमाणे फिर्याद दाखल केली. सदर केस ची पुढील सुनावणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी कर्वे यांच्या समोर झाली. फिर्यादी पतसंस्थेकडून व्यवस्थापक सुरेश विठ्ठल कुलकर्णी यांची साक्ष नोंदविण्यात आली. तसेच अवश्यक तो कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला. फिर्यादिची गुणदोषावर सुनावणी होऊन आरोपी विशाल नारायण साबळे यास दोषी धरून त्याला न्यायाधीश दिपक कर्वे यांनी फौ.प्र.सं. १९७३ चे कलम २५५-२ नुसार तथा परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ मध्ये दोषी धरून तीन महिन्याची साधी कैद व रुपये सहा लाख पंचावन्न हजार दंड अशी

नी.मु.घटवाई विद्यालयात सांस्कृतिक महोत्सव- २०२४ चे आयोजन

दै.जनप्रभात
वडनेर /प्रतिनिधी

स्थानिक वडनेर येथील नी.मु.घटवाई विद्यालय ,कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात २६ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ दरम्यान सांस्कृतिक महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. भव्य विद्यार्थ्यांच्या रॅलीमध्ये लेझीम पथक, डंबेल्सपथक व वैविध्यपूर्ण वेषांमध्ये विद्यार्थी उपस्थित होते.

२७ जानेवारी शनिवारला क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन संजय मिश्रा ठाणेदार ,वडनेर यांच्या हस्ते करण्यात आले .विद्यार्थ्यांच्या कबड्डी ,खो-खो, क्रिकेट व रनिंग या सामन्यांचे अंतिम सामने मोठ्या उत्साहात खेळण्यात आले. उद्घाटक संजय मिश्रा यांनी खेळाचे जीवनातील महत्त्व व विविध उपक्रमात भाग घेतल्याने आपली होणारी प्रगती समजावून सांगितली.

सांस्कृतिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी जनता विद्या विहार व नी. मु. घटवाई प्राथमिक व उच्च प्राथमिक विभागाचे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले .प्रास्ताविकेच्या माध्यमातून प्राचार्य राजेश सातपुते यांनी वर्षभरात शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली .कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. रामदास आंबटकर ,आमदार ,विधान परिषद यांनी केले .त्यांनी विचार व्यक्त करताना वडनेर मध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मोठे जिल्हा स्टेडियम झाले पाहिजे .ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सर्व सुविधा प्राप्त झाल्या पाहिजे असे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात देशावर आधारित विविध प्रकारचे नृत्य व सुंदर सुंदर नाटिका सादर केल्या.

३० जानेवारी मंगळवारला माध्यमिक विभाग व उच्च माध्यमिक विभागाचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. उद्घाटक समीर कुणावर, आमदार ,हिंगणघाट ,यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .विद्यार्थ्यांनी शालेय उपक्रमात सहभागी झाल्याने चांगले खेळाडू व चांगले भारताचे नागरिक घडतात असे स्पष्ट केले .प्रमुख पाहुणे कमलेश जैन, महाव्यवस्थापक ,जिल्हा उद्योग केंद्र वर्धा यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज करताना विद्यार्थ्यांनी उद्योजक बनावे. वेगवेगळ्या प्रकारच्या सुविधा व सबसिडी अनेक उद्योगांमध्ये भेटतात. त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यायला पाहिजे .असे स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सुंदर सुंदर देशावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम व नाटिकांची सादरीकरण केले . परिसरातील शेती विषयक उत्कृष्ट कार्य करणाऱ्या भूमिपुत्रांचा सत्कार शाल व श्रीफळ देऊन माननीय राजेंद्र डागा ,अध्यक्ष ,लोक शिक्षण मंडळ हिंगणघाट यांच्या हस्ते करण्यात आला.

सांस्कृतिक महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे ३१ जानेवारी बुधवारला बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय राजेंद्र डागा हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासू असावयास पाहिजे .विविध उपक्रमात भाग घेऊन मेहनती बनल्यास त्यांना जीवनात यश प्राप्ती होते असे स्पष्ट केले .कार्यक्रमात हस्तलिखित उद्योन्मुखचे विमोचन करण्यात आले.कार्यक्रमाला उपस्थित असलेले सुभाष टाकळे, शिक्षण विस्तार अधिकारी, सौ कविताताई वानखेडे ,सरपंच,ग्रामपंचायत वडनेर व विठ्ठल तपासे केंद्रप्रमुख वडनेर यांनी विचार व्यक्त केले.

उपमुख्याध्यापक रवींद्र गोडे यांनी शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती प्रास्ताविकेच्या माध्यमातून दिली. कार्यक्रमाला वसंत आंबटकर , विवेक लोढा,विनय बाबू लोढा, सुभाष शिंदे ,सौ संध्याताई डागा ,शिखरचंद मुनोत, आशिष वैरागडे , घनश्याम जवादे, बंशी जी, रोशन बाबू डागा,पर्यवेक्षिका मनिषा चव्हाण ,मंगेश चवडे, तुषार आंबटकर उपस्थित होते . कार्यक्रमाचे संचालन सेजल



घाटुर्ले, साक्षी भालेराव, भाग्यश्री आंबटकर, पौर्णिमा शुक्ला, दिलकश शेख या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रदर्शन राखी कुरसंगे, वैष्णवी आत्राम या विद्यार्थिनींनी केले .कार्यक्रमाला विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोज देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निकृष्ठ

दै.जनप्रभात
नरखेड /प्रतिनिधी

नरखेड तालुक्यातील मेंढला ते वाढोना रस्त्याचे दुरुस्तीचे काम गेल्या ४ दिवसांन पासून सुरू होते.या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ७० लक्ष रुपयांचा निधी सुध्दा शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुप्रीमो इंफ्रा. या कंपनीने घेतले असून कंपनी कडून दुरुस्तीच्या कामाला सुरवात करण्यात आली आहे. कंपनी कडून करण्यात येणारे काम अतिशय निकृष्ठ असून दुरुस्ती साठी वापरण्यात येणारे साहित्य सुध्दा निकृष्ठ असल्याचा आरोप त्या भागातील नागरिकांनी केला आहे. याबाबत त्या भागातील नागरिकांनी वाढो ना येथील सरपंच व ग्राम पंचायत सदस्य यांच्या कडे तक्रार केली. मिळालेल्या तक्रारीवरून सरपंच यांनी रस्त्याची दुरुस्ती करणाऱ्या कंपनीला पत्र देऊन ते काम त्वरित थांबवायला लावलं. जो पर्यंत संबंधित विभागाकडून या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाची चौकशी होत नाही तो पर्यंत काम सुरू



करायचे नाही असे निर्देश त्या कंपनीला दिली. सरपंच हरिभाऊ कवडती, उपसरपंच पांडुरंग बनाईत, ग्राम पंचायत सदस्य भूषण दंढारे, नितेश मानेकर, मनोज बोडखे, किशोर बोडखे, कोमल चापेकर, नितीन चापेकर, रोषण चापेकर, सुनील कथले, सचिन डोंगरे, सुनील काटे, होमराज चरपे यांनी स्वतः जाऊन रस्त्याच्या दुरुस्तीची पाहणी केली. फोटो ओळी. हाच तो दुरुस्ती सुरू असलेला मेंढला ते वाढोना रस्ता.

मैदानी खेळाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुणांनी उन्नती करावी: ठाणेदार संदिप गाडे

दै.जनप्रभात
तालुका प्रतिनिधी / अमोल झाडे

समुद्रपुर:-आज अनेक युकांचा कलह डॉक्टर,ईजियर होण्याकडे आहे.मात्र यासाठी महागड शिक्षण द्याव लागले ज्या तरुणांची आर्थिक परिस्थिती उच्च शिक्षण घेण्याची नाही अशा ग्रामीण भागातील तरुणांनी मैदानी खेळाकडे लक्ष देऊन यात मेहनत चिकाटीने आपल्या कत्तूवाच्या जोरावर खेळाच्या माध्यमातून उन्नती करावी असे मत गिरड पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदिप गाडे यांनी मोहगांव येथे आयोजित कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित तरुणांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.जय माताजी क्रीडा मंडळाच्या वतीने भव्य एकदिवसीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेचे उद्घाटन म्हणून ठाणेदार संदिप गाडे तर अध्यक्षस्थानी सरपंच विलास नवघरे, प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच विजय तडस,नरेश चौधरी,गोविंदराव रंदये,अंकुश मांडवकर, निलेश कापसे, हरीभाऊ डडमल,



तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अनिल धोटे, ग्रामपंचायत सदस्य संदीप दातारकर,आदी उपस्थित होते यावेळी बजरंगबली ,वैराग्य मुर्ती संत गाडगेबाबा, यांच्या प्रतिमेचे पूजन करून कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना पुढे मार्गदर्शन करताना ठाणेदार गाडे म्हणाले की दिवसेंदिवस वाढत्या मोबाईलच्या वापरामुळे ग्रामीण भागातील तरुणांचे मैदानी खेळापासून लक्ष विचलित झाले आहे.मात्र तर योग्य कामांसाठी मोबाईल वापर करून उरलेल्या वेळात खेळांकडे दक्ष दिले तर या खेळाच्या माध्यमातून पोलिस खात्यात नोकरी मिळविण्याची सर्वांना संधी आहे.फक्त व्यसनाच्या दुर राहुन मेहन व चिकाटीने शिक्षकासह आपला वेळ खेळात देऊन संधीचे सोने करावे असे मत त्यांनी व्यक्त केली यावेळी जय माताजी क्रीडा मंडळाचे पदाधिकारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हजरत सय्यद तुराबुल हक दर्ग्याच्या उरूस यात्रेला मानाच्या संदलने सुरुवात



दै.जनप्रभात
परभणी /अरविंद कांबळे

परभणी, मागील शतकापासून मानाच्या सदलाची परंपरा कायम आहे. परभणी येथील महान सुफी संत हजरत सय्यद शहा तुरा बुलहक यांची परभणी शहरामध्ये दर्गा हे सर्व धर्म समभावाचे एकतेचे प्रतीक आहे. तसेच परभणी जिल्हा वाशियांचे एक श्रद्धास्थान आहे. येथे उरूस यात्रेची सुरुवात झाली आहे. याप्रसंगी यात्रेला राज्यातून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. येथे मानाचा संदल पण निघत असतो. यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे यांनी मानाचा संदल घेऊन संत हजरत सय्यद शाह तुराबुल हक साहेब यांच्या उरूस यात्रेला मानाच्या संदलने सुरुवात केली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक राग सुधा, उरूस समितीचे व्यवस्थापक खुशरोखान, नागरिक या उत्सवात सहभागी झाले. कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून शांततेत उरूस यात्रा पार पाडावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले.

****

संभाजीनगरात आजपासून वेरूळ-अजिंठा महोत्सव

दै.जनप्रभात
प्रतिनिधी/ मोहन अखाडे

छत्रपती संभाजीनगर : - जिल्ह्याच्या पर्यटन वृद्धीला प्रोत्साहन देणारा आणि शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणारा वेरूळ-अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सव शुक्रवारपासून सुरू होत आहे. पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत सोनेरी महल येथे सायंकाळी ६.३० वाजता उद्घाटन होईल, अशी माहिती संयोजन समितीने दिली. पालकमंत्री संदीपान भुमरे, मंत्री अतुल सावे, मंत्री अब्दुल सत्तार, आमदार संजय शिरसाट, खासदार इम्तियाज जलील, लोकसेवा हक्क आयोगाचे राज्य आयुक्त दिलीप शिंदे, मनपा प्रशासक जी. श्रीकांत, पोलिस आयुक्त मनोज लोहिया, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, राज्य पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे, पर्यटन सदिच्छा दूत नवेली देशमुख आदींची उपस्थिती राहणार आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रम.... उद्घाटनानंतर



प्रसिद्ध नृत्यांगना डॉ. संध्या पुरेचा १६ कलाकारांच्या चमूसह भरतनाट्यम सादर करतील. त्यानंतर पंडिता अनुराधा पाल यांच्या स्त्री शक्ती इन्स्ट्रुमेंट्स फ्युजनच्या टीमसह स्त्री शक्तीवर आधारित पाच वाद्यांचे सादरीकरण करतील. तसेच राहुल देशपांडे आणि प्रियांका बर्वे हे दोन्ही प्रसिद्ध शास्त्रीय व उपशास्त्रीय गायक अभंग आणि मराठी गीत सादर करतील.

जवाहर उर्दू हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयसह डॉ. एपीजे कलाम कॉन्व्हेंट मध्ये स्नेहसंमेलन



दै.जनप्रभात अवधूत शेंद्रे

वर्धा :- आष्टी (श):- स्थानिक राष्ट्रीय एज्युकेशन अँड कल्चर सोसायटी डरा संचालित जवाहर उर्दू हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयासह डॉ एपीजे अब्दुल कलाम कॉन्व्हेंट तर्फे ४ दिवसीय विद्यार्थी स्नेहसंमेलन मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला सदर सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन आष्टी नगरपंचायत उपाध्यक्ष तथा संस्था सचिव जनाब जाकीर हुसेन यांच्या हस्ते झाले या सांस्कृतिक कार्यक्रमात केजी ते इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांनी देशभक्ती गीतासह मनोरंजन गीतावर विविध कला दाखवत आपले कौशल्य दाखवले सामाजिक एकात्मतेसाठी आणि जनजागृती करण्याच्या दृष्टीने विविध नाट्यकृती सादर केल्यात शिवाय यातच आनंद मेळावा घेण्यात आला त्यात स्वादिष्टपुर्ण आहार विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार करून एक अनोखा अविष्कार दाखवला आनंद मेळाव्याचे उद्घाटन जनाब शगिर अहेमद यांनी केले तर यातच झालेल्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन संस्था अध्यक्ष जनाब काजी फिरोजदिन यांनी केले कार्यक्रमाचे संचालन शिक्षक अन्सार अहमद खान यांनी तर आभार प्राचार्य शहजाद अहेमद यांनी मानले कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिकासह विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उर्दू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय व डॉ. एजीपी अब्दुल कलाम कॉन्वेंट मधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

ब्र. वं. रा. तुकडोजी महाराज यांचा ५५ पुण्यस्मरण सोहळा गिरड येथे उपक्रमात्मक स्पर्धा राबवून संपन्न

दै.जनप्रभात
तालुका प्रतिनिधी /अमोल झाडे

समुद्रपुर:- २९, ३० व ३१ जानेवारी २०२४ रोज सोमवार मंगळवार बुधवार ला श्री गुरुदेव प्रार्थना मंदिर गिरड येथे ब्रम्हलीन वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५५ पुण्यस्मरण सोहळा गिरड येथे उपक्रमात्मक स्पर्धा राबवून संपन्न करण्यात आला होता या कार्यक्रमाचे उद्घाटक आरिफ रहीम शेख रुग्ण मित्र तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष वामनराव झिंगरे ज्येष्ठ उपासक प्रमुख उपस्थिती गिरड ग्रामपंचायत चे सरपंच राजू नौकरकर गिरड ठाण्याचे ठाणेदार संदीप गाडे डॉ.विजय खोंड गिरड ग्रामपंचायतिचे उपसरपंच मंगेश गिरडे ज्येष्ठ उपासक रामभाऊ डेकाटे गुरुदेव प्रचारक अशोक हलवाई पत्रकार संघाचे अध्यक्ष निर्भय पांडे श्रीराम मंदिर देवस्थानचे अध्यक्ष बलवंत गाठे गाडगेबाबा देवस्थानचे अध्यक्ष कडूजी वानोडे माऊली देवस्थानचे अध्यक्ष मनोज गिरडे सामाजिक कार्यकर्ते अरुण मोटघरे या कार्यक्रमांमध्ये वंदनीय राष्ट्रसंत रचित राज्यस्तरीय कल भजन गायन स्पर्धा पोस्टर स्पर्धा निबंध स्पर्धा श्लोक पाठांतर स्पर्धा गिरड भूषण सन्मान सोहळा एक रात्र कवितेची शासन आपल्या दारी रोगनिदान शिबिर रक्तदान शिबिर सर्वधर्मीय प्रार्थना ग्राम नाथाला ग्रामगीता अर्पण अशा उपक्रमशील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज रचित राज्यस्तरीय एकल भजन स्पर्धा या भजन गायन स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील नामवंत ३० स्पर्धक सहभागी झाले होते यामध्ये प्रथम क्रमांक हिंगणघाट येथील सुरेंद्र डोंगरे द्वितीय क्रमांक





रसुलाबाद येथील संतोष तायडे तृतीय क्रमांक वणी येथील प्रशांत होरे चतुर्थ क्रमांक धनंजय लोटे बाबुळगाव पाचवा क्रमांक अजय अतकर मदनी सातवा शुभम काटकर वरोरा सातवा साईनाथ मांडवकर सिर्सी आठवा सौ. वंदना खंडाळे काटोल नववा क्रमांक नितीन वानखेडे बोरगाव मेघे दहावा क्रमांक विष्णू ब्राह्मणवाडे गिरड अकरावा क्रमांक नरेश चांदेकर वरोरा बारा क्रमांक सचिन उंबरकर गिरड तेरावा क्रमांक मनीष होरे वनी चौदावा क्रमांक सक्षम धनकुटे या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खंजिरी वादक म्हणून श्री गुरुदेव सेवा मंडळाचे भजन प्रमुख गोपाल महाराज तेलरांधे हे ठरले पोस्ट स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आदित्य अंबाडरे द्वितीय क्रमांक अंशुमन दीक्षित तृतीय क्रमांक भावेश जांभुळे चतुर्थ प्रियाली तेलरांधे पाचवा क्रमांक आयुष भांदक्कर सहावा क्रमांक नयन लाजूरकर निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मोहिनी भोसकर द्वितीय क्रमांक आर्यन हेडाऊ तृतीय क्रमांक अंशू डडमल चतुर्थ क्रमांक विदायू लाजुरकर पाचवा क्रमांक भावेश भजभूजे रक्तदान शिबिरामध्ये गावातील २५ युवक युर्तीनीआपले रक्त देऊन सामाजिक कार्याविषयी आवड दाखविली दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा गिरड गावाला उत्कृष्ट सेवा देणाऱ्या तीन सन्माननीय नागरिकांना गिरड भूषण सन्मान देऊन गुणगौरव करण्यात आला किशोर भांदक्कर कलाशिक्षक अनेक विद्यार्थ्यांना कलेबाबत प्रोत्साहित करून विद्यार्थी घडविण्याबाबत हा सन्मान देण्यात आला त्याचप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रामध्ये गावाला उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल डॉ.सौ. नीलिमा सुनील गौर गावातील अनेक विवाहित महिलांना समुद्रेशन करून त्यांचा कुटुंबिक समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य असे मार्गदर्शन करणारे योग्य उद्देशाने समाजाकरिता सदैव सेवा करणारे शामरावजी भुजाडे गुरुजी यांना गिरड जनसेवा सन्मान देऊन त्यांचा गुण गौरव करण्यात आला या सोबतच विकास विद्यालयाचे प्राचार्य शरद तडस क्रीडाशिक्षक राजू कांबळे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा मुली येथील मुख्याध्यापिका माया चापले सोबतच दिलीप महाजन जिल्हा परिषद प्राथमिक उच्च शाळा मुले मुख्याध्यापिका उषा गावंडे यांना सुद्धा सन्मानित करण्यात आले कार्यक्रमांमध्ये परिसरातील दहा दिंडी भजन मंडळींनी शोभायात्रेमध्ये भाग घेतला शोभायात्रेमध्ये लेझीम पथक लाठीकाठी भजनी मंडळी थोर संतांच्या वेशभूषा या पद्धतीने गावाच्या प्रमुख मार्गाने ही राम धुन शोभायात्रा काढण्यात आली. या कार्यक्रमा मध्ये गोपाल काल्याचे किर्तन हरिभक्त परायण श्री मारोतरावजी वरडोळे महाराज वडगाव यांच्या हस्ते गोपालकाल्याचे किर्तन करण्यात आले गोपालकाल्याच्या विषयावर विचार मंथन करण्याकरिता अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे वर्धा जिल्ह्याचे सेवा अधिकारी श्री प्रभाकर गायकवाड हे उपस्थित होते त्याचप्रमाणे ग्रामगीता जीवन विकास परीक्षा वर्धा जिल्हा अध्यक्ष मनीष गंगाधर जगताप महेश राजपाल गौर तुषार गिरडे अतुल काळबांडे राजेंद्र डागा राजू मॅडमवर यांची प्रमुख उपस्थिती होती श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने कला रसिकांकरिता एक रात्र कवितेची या कार्यक्रमाचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते यात कविवर्य जयंत चावळे यवतमाळ सुप्रसिद्ध मराठी वराडी कवी त्याचप्रमाणे सतीश शोभाताई दिवाकर गारघाटे साखरा यांनी सुद्धा कविता सादर केल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल गौरकर प्रमुख अतिथी ज्ञानेश्वर चौधरी अभिजीत डाखोळे तंटामुक्ती अध्यक्ष राकेश चंदनखेडे नूतन गिरडे मनोज भांदककर यांची उपस्थिती होती याप्रसंगी हिंगणघाट समुद्रपूर सिंदी रेल्वे मतदार संघाचे शब्दयोगी कार्यसम्राट आमदार श्री समीर कुणावर यांनी अत्याधुनिक अभ्यासिकेचे भूमिपूजन केले सोबतच सर्व श्री गुरुदेव उपासकांना शिक्षण व अध्यात्म या विषयाची सांगड घालीत प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव अंडरस्कर यांनी केले तर प्रस्तावना मंथन भांदक्कर यांनी मांडली या एकंदरीत पूर्ण कार्यक्रमाचे आभार चंद्रमणी ढेंगळे यांनी केले या तीन दिवसीय कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता श्री गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष विष्णू ब्राह्मणवाडे सचिव संदीप शिवणकर उपाध्यक्ष गोपाल तेलरांधे नितीन लाजूरकर सौरभ शेळके कोषाध्यक्ष प्रशांत लांडे हर्षल थुटे स्वप्निल रोहनकर गोपीकृष्ण थुटे प्रभाकर रोहनकर सचिन उंबरकर अनिल गौरकर बादल बोरेकर साहिल सोनवणे भूषण पाठक आनंद डेकाटे सुमित वाघमारे वैभव गिरडे श्लोक लाजूरकर गौरव कावळे अथर्व शिवणकर भावेश ब्राह्मणवाडे कविता येनुरकर उन्नती पानबुडे वैष्णवी गुंडे यावली झिंगरे संजना फोपारे रेखा डरे सुषमा दुबे पुनम ब्राह्मणवाडे वेदिका चामचोर भाग्यश्री वटे ज्ञानेश्वरी ब्राह्मणवाडे कृष्णा गुंडे मानसी चामचोर रोशनी तेलरांधे संगीता देवतळे सिंधुताई तेलरांधे या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मेहनत घेतली.

ग्राहक पंचायत च्या शहराध्यक्षपदी सय्यद सलीम यांची निवड



दै,जनप्रभात
अरविंद कांबळे
परभणी

पूर्णा:- अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या पूर्णा शहर अध्यक्षपदी सय्यद सलीम सय्यद मुनसब यांची सर्व नमूते निवड करण्यात आली त्यावेळी डॉ. विलास मोरे अध्यक्ष देवगिरी प्रांत अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी जिल्हा संघटक धाराजी भुसारे एडवोकेट मीराताई शेळगावकर गंगाधर कानेकर मधुकर मुळे तालुकाध्यक्ष जनार्दन आवरगंड आनंद ढोणे संजय पांचाळ सुशिल गायकवाड गोविंद मोरे कृष्णा काळे नारायण सोनटक्के आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या

महारेशीम अभियानात वर्धा जिल्हा विभागात अव्वल
५९३ हेक्टर तुती लागवडीसाठी ५५० शेतकऱ्यांची नोंदणी



दै.जनप्रभात
वर्धा, दि.२ (जिमाका)

रेशीम शेती कमी खर्चात अधिक उत्पन्न देणारी शेती आहे. या शेतीकडे अधिकाधिक शेतकऱ्यांनी वळावे यासाठी राज्यात महारेशीम अभियान राबविण्यात आले. या अभियानात जिल्ह्याने उत्तम काम केले आहे. अभियान कालावधीत ५९३ हेक्टर तुती लागवडीसाठी ५५० शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली असून विभागात ही सर्वाधिक नोंदणी आहे. पारंपारिक पिकांसोबतच शेतकऱ्यांनी इतर पिके सुध्दा घ्यावी, यासाठी गेल्या काही वर्षात सातत्याने प्रयत्न केले जात आहे. रेशीम कोष उत्पादनाकडे शेतकऱ्यांनी वळावे यासाठी मनरेगा, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-२ योजनेंतर्गत जमीन तयार करणे, तुती रोपे लागवड, किटक संगोपनगृह बांधकाम, ठिंबक सिंचन व पाणी व्यवस्थापन, किटक संगोपन साहित्य यासाठी अनुदान दिले जाते.जिल्ह्यात काही वर्षात तुतीचे क्षेत्र सातत्याने वाढले आहे. जिल्ह्यात ३०१ एकरवर तुतीची लागवड झाली आहे. गेल्या केवळ एकाच वर्षात १०७ एकरने तुतीचे क्षेत्र वाढले आहे. शेतकऱ्यांना यासाठी प्रोत्साहित करण्याकरीता रेशीम विभागाच्यावतीने अंडीपुंजांचा तसेच चॉकी धारकांकडुन चॉकीचा पुरवठा केला जातो.रेशीम कोष उत्पादनातून शेतकऱ्यांना वर्षभरात एकरी ४ ते ५ बॅचडरे ४ ते ५ क्विंटल कोष उत्पादन मिळते. आज अखेरपर्यंत जिल्ह्यात २३ मेट्रीक टन कोष उत्पादन झाले आहे. हे उत्पादन देखील विभागात सर्वाधिक आहे. यावर्षी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शेतकऱ्यांना रेशीम शेतीकडे वळविण्यासाठी व्यक्तीश: प्रयत्न केले आहे. रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतात भेटी दिल्या व शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. त्यामुळेच महारेशीम अभियानात तुती लागवड नोंदणीत जिल्हा विभागात अव्वल राहिला आहे. रेशीम अधिक उत्पन्न देणारी शेती – राहुल कर्डिले रेशीम कमी खर्चात अधिक उत्पादन देणारे पिक आहे. या पिकाकडे शेतकऱ्यांचा कल वाढावा यासाठी अनुदान दिले जाते. जिल्ह्यात तुती लागवडीसाठी सकारात्मक वातावरण तयार होत आहे. महारेशीम अभियान २०२४ मध्ये जिल्ह्याला ३०० एकर तुती लागवडीसाठी नोंदणीचे लक्षांक होते. प्रत्यक्षात ५५० शेतकऱ्यांनी ५९३ एकरवर नवीन नाव नोंदणी केली. विभागात ही सर्वाधिक नोंदणी आहे.

****

गोंडी पुणेम ध्वजारोहण,वीरांगना राणी दुर्गावती जयंती समारोह व सांस्कृतिक कार्यक्रमाला माजी मंत्री श्री.राजेंद्रजी मुळक यांची उपस्थिती दैनिक जनप्रभात जयश्री मेंघरे रामटेक



दै.जनप्रभात
रामटेक /प्रतिनिधी

कडबीखेडा येथील जनसेवा नवजयुवक मंडळ यांच्यातर्फे आयोजित गोंडी पुणेम ध्वजारोहण,वीरांगना राणी दुर्गावती जयंती समारोह व सांस्कृतिक कार्यक्रमाला मा.श्री. राजेंद्रजी मुळक (माजी मंत्री तथा अध्यक्ष नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी) यांनी उपस्थित राहून उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी श्रीमती शांताताई कुंमरे (सदस्य जि प नागपूर), श्री. ऊपेश उईके (सरपंच डोंगरताल ग्रा.पं.), श्री. उमेश भांडारकर (सरपंच बेलदा ग्रा.पं.), श्री. परसराम तुंमडाम (माजी सरपंच), श्री. जाकीरअली सय्यद (सदस्य डोंगरताल ग्रा.पं.), श्री. विश्वनाथ टेकाम (सदस्य डोंगरताल ग्रा.पं.), सौ. बबीताताई वाडीवे (सदस्य डोंगरताल ग्रा.पं.), श्री. प्रमोद कुंमरे सदस्य (देवलापार ग्रा.पं.), श्री. परमेश्वर इनवाते (पोलीस पाटील), श्री. गंगाराम मरापे (पोलीस पाटील), सौ. पुष्पाताई तुमडाम (पोलीस पाटील), सौ. जयवंतीताई भलावी (अंगणवाडी सेविका), श्री. झनक वाडीवे, श्री. रामदास उईके, श्री. राजू भलावी, श्री. हितेश तुंमडाम, श्री. धनराज वाडीवे, श्री. परसराम वाडीवे, श्री. संतराज वाडीवे, श्री. मनराज वाडीवे, श्री. राधेश्याम सर्याम, श्री. निलेश वाडीवे, श्री. विशाल मरसकोल्हे इत्यादी मान्यवर तथा गावकरी उपस्थित होते.



जिल्ह्यात वाळू विक्रीसाठी डेपो सुरू



वर्धा, दि.२ (जिमाका) :

सुधारित वाळू धोरणानुसार २०२३-२४ या व्दितीय वर्षासाठी वाळू डेपो सुरू करण्यात आले आहे. हिंगणघाट तालुक्यातील डेपो क्र. ५ मौजा सावंगी (रिठ) येथे १०० ब्रास साठा, डेपो क्र. ६ मौजा येळी येथे १ हजार २८९.६६ ब्रास व वर्धा तालुक्यातील डेपो क्र. ७ मौजा आलोडी येथे ७० ब्रास वाळू साठा उपलब्ध आहे. वाळू खरेदीसाठी जिल्ह्यातील नागरिकांना महाऑनलाईन (सीएससी व सेतू) केंद्रातून नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. महाखनिज या संकेतस्थळावर वाळूची नोंदणी करता येईल. नागरिकांनी १३३ रुपये प्रती मेट्रीक टन आणि त्यावर १० टक्के जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी या दराने वाळू खरेदी करता येईल, असे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कळविले आहे.

मा गोपाळभाऊ माने यांची शिवसेना पक्षाच्या लातूर जिल्हाप्रमुख पदी फेर निवड !



दै.जनप्रभात
नवनाथ डिगोळे /लातूर

संजय भाऊराव मोरे शिवसेना सचिव यांच्या हास्ते नियुक्ती पत्र देऊन शुभेच्छा दिल्या. विविध स्तरांवर त्यांना शुभेच्छांचा वर्षाव. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते माननिय श्री. एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या जिल्हाप्रमुख पदी (कार्यक्षेत्र लातूर ग्रामीण, अहमदपूर व उदगीर विधानसभा) नियुक्ती करण्यात येत आहे. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण याचा आपण सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास आहे. तसेच सोबत सर्व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

****

पारशिवनीची दीक्षित काकडेची टिम झेनिथ दुबईत चमकली आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक उत्सव
पारशिवनी या चित्रपटातून दीक्षित काकडे यांनी नाव कमावले

दै.जनप्रभात
नागपूर:-नंदू कोल्हे

नागपूर जिल्हा पारशिवनी तहसील येथील सामाजिक कार्यकर्ते रामू काकडे यांची कन्या दिक्षिता काकडे हिची आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सव दुबई मध्ये निवड झाली.यामध्ये आयोजक शीतल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली दिक्षिता काकडे हिने निवडीबद्दल सांगितले. टीम जेनिथच्या कलाकारांनी प्रजासत्ताक दिनी त्यांची शैली दाखवली. ढखच् इंटरनॅशनल इंटरनॅशनल कल्चरल फेस्टिव्हल दुबईच्या दूतावास कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. डॉ.मनिष गवई, मिथिल कळंबे, सतीशकुमार सिवन यांची प्रमुख उपस्थिती होती. अनेक कलाकारांनी भारतीय कलेचे प्रदर्शन केले. नृत्य, गाणी, शास्त्रीय संगीत, लोककला सादर केली. एकूण ४५ कलाकारांनी सहभाग घेतला. जोत्स्ना नागरे, निलिमा देशमुख, चंदा भाकरे, नंदा खंदारे, करुणा कदम, दिया ठक्कर, विया गुप्ता, देवठकर, हनी ठक्कर, शीतल भगत, दिव्या माहुरे, विभा गुमा, दिक्षीका काकडे, अनुष्का काकडे, अनामिका भुसारी, रश्मी रश्मी यांच्या हस्ते झाले. सतीशकुमार सिवन.मेश्राम, नेहाली पाहुजा, गायत्री बागडे, स्वाती आगडे, आम्रपाली शिवणकर, अंजली पाटील, नलिनी बोरट, स्वप्रेजा इंगोले, शिलवाल ढोके, ज्योती ढोके, शामल कळंबे, सारा कळंबे आदी कलाकारांचा गौरव करण्यात आला.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा आष्टी (शहीद)



दै.जनप्रभात
सुनील मांडवे प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासून आर्थिक साक्षरता रुजवण्याच्या दृष्टीने पैशाची नियोजन गुंतवणूक बँकेचे व्यवहार कर्ज व्याज प्रणाली इत्यादी बाबत तसेच आर्थिक व्यवहार करता यूपीआय सारख्या आधुनिक साधनांचा वापर करताना घ्यावयाची काळजी याबाबत तज्ञ व्यक्तीची मार्गदर्शन पर व्याख्यान

राष्ट्रीय ग्राहक दिनाचे अवचित साधून लोकमान्य विद्यालय आष्टी येथे विद्यार्थी ग्राहक मंडळातर्फे साक्षरता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री विजय दाभाडे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा आष्टीचे व्यवस्थापक श्री धनंजय देशपांडे तसेच वरिष्ठ कर्मचारी श्री पठाण साहेब उपस्थित सर्वप्रथम भारत मातेच्या प्रतिमेचे पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली प्रमुख वक्त्यांनी आपले विचार मांडले विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक जीवनापासून आर्थिक साक्षरता रुजण्याच्या दृष्टीने नियोजन कसे करावे या विचार मांडले गेले खाऊचे जमा केलेले जमा पैसे बँक खाते उघडून कसे जमा करायचे आपला बँकेतील व्यवहार कसा करायचा पैसे भरतेवेळी पैसे काढते वेळी पावत्या कशा लिहायच्या तसेच दैनिक ठेव मासिक ठेव मुदती ठेव यावर माहिती देण्यात आली बँकेचे कर्ज वाटप व त्यावरील व्याज आकारणी तसेच वैयक्तिक कर्ज कृषी कर्ज गृह कर्ज वाहन कर्ज त्यांच्या परतफेड ची पद्धत अशा अनेक गोष्टी विद्यार्थ्यांना समजून सांगण्यात आले साधनाडरे बँकेचे व्यवहार कसे सुरु होतात तसेच हा व्यवहार करताना काय काळजी घ्यावी हे सांगितले व्यवहार करताना होणारी संभव फसवणूक ध्यानात घेऊन व्यवहार कसे करावे फेक मेसेज पासून सदैव सावध कसे राहावे बँक विषयक वैयक्तिक माहिती कुणालाही न सांगणे बँकेचे सर्व व्यवहार करताना आवश्यक ते गोपी नेता व खबरदारी घेणे हे सगळे विद्यार्थ्यांना उदाहरणासहित समजून घेण्यात आले विद्यार्थ्यांनी देखील काही प्रश्न विचारून आपले शंका समाधान करून घेतले त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक श्री दाभाडे यांनी आपले विचार मांडले शेवटी आभार प्रदर्शन श्री लोहकरे सर यांनी केले पसायदानाने कार्यक्रमाची शांत झाली

जिल्हास्तरीय शालेय नृत्य स्पर्धेस प्रारंभ. दोन दिवसात प्रेक्षक रसिकांना मंत्रमुग्ध करणारे कार्यक्रम.

दै,जनप्रभात
उपसंपादक / राठोड रमेश पंडित

किनगाव : लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून मराठी पत्रकार संघाच्या वतीने शालेय नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे या दोन दिवसांत प्रेक्षक रसिकांना मंत्रमुग्ध करणारे नृत्याचे कार्यक्रम पहावयास मिळणार आहेत.दि.३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते १० वाजण्याच्या सुमारास इय्यता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या जिल्हयातील विध्यार्थांच्या नृत्य स्पर्धा होतील या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच श्रीमती सुमित्राबाई वाहुळे तर उदघाटकन जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंह घोणे यांच्या हस्ते होईल प्रमुख पाहुणे माजि राज्यमंत्री विनायकराव पाटील, उपजिल्हाधिकारी प्रविण फुलारी, तहसिलदार शिवाजी पालेपाड, सहसंचालक रामजी दहीफळे, सपोनि भाऊसाहेब खंदारे,उपसरपंच विठ्ठलराव बोडके, गटशिक्षणाधिकारी बी.एम.ढोकाडे,रिपाई जिल्हा उपाध्यक्ष सुनिल वाहुळे हे उपस्थित रहातील असे मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोरख भुसाळे,उपाध्यक्ष असलम शेख, सचिव जाकेर कुरेशी, सहसचिव अनवर बागवान, समन्वयक शेटीबा श्रंगारे, कार्यध्यक्ष अफजल मोमीन, रोकडोबा भुसाळे आदी आयोजक यांनी कळविले आहे.



राशन दुकानांवर आता मिळतील साड्या
होळीपर्यंत सर्व शिधापत्रिकाधारकांना मिळणार लाभ

दै.जनप्रभात
कामठी:-नंदू कोल्हे

अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना प्रति कुटुंब एक साडी मोफत वाटप करण्याच्या कॅप्टिव्ह मार्केट योजनेला शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना शासनाकडून प्रति कुटुंब एक साडीचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ सर्व शिधापत्रिकाधारकांना तातडीने देण्यात येणार असल्याचे खासदार भावना गवळी यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना कळविले आहे. या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाची नोडल संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महामंडळामार्फत अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांच्या सुट्ट्याप्रमाणे साडयांचे गठ्ठे तयार करून त्या विभागाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेला रास्तभाव दुकानाच्या नावाने वितरित केल्या जातात. लेव्हल पीडीएस प्रणालीच्या गोदामांना साड्यांचा पुरवठा केल्यानंतर, हे अन्न नागरिकांच्या गोदामात पोचवले जाईल, महामंडळाने पुरवठा केला जाईल आणि ग्राहक संरक्षण विभाग अत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना साड्यांचे वाटप करण्याची आणि देखरेखीची जबाबदारी असेल. त्यांना , ही योजना प्रत्येक गावात पोहोचणार आहे या योजनेंतर्गत प्रजासत्ताक दिनापासून होळीपर्यंत साड्यांचे वाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, विहित कालावधीत राज्यातील प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावातील रास्तभाव दुकानात साड्या पोहोचतील. याची काळजी घेण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने राज्य यंत्रमाग महामंडळाला कळविले आहे. या योजनेचा लाभ सर्व लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात येत असून, लाभार्थ्यांना याबाबत काही अडचण असल्यास त्यांनी जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लावू नये, शिंदे समिती रद्द करावी यासाठी वडवणी तहसीलदारांना निवेदन सादर

दै.जनप्रभात
बीड /प्रतिनिधी
गितांजली लव्हाळे

राज्यातील ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये यासाठी आणि राज्य सरकारने गठित केलेली शिंदे समिती रद्द करण्यात यावी या मागणीसाठी आज वडवणी तालुक्यातील ओबीसी समाज बांधवांने वडवणी तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

या संदर्भात अधिक माहिती अशी की, राज्यातील आणि देशातील ओबीसी समाज बांधवांना भारतीय राज्यघटनेने घटनात्मक आरक्षण दिले आहे याच आरक्षणामुळे ओबीसी समाज बांधव थोडी फार प्रगती करू पाहत आहे. परंतु ओबीसी प्रवर्गात पहिल्याच ३७४ जातीचा समावेश आहे आजही ओबीसींच्या लोकसंख्येनुसार आरक्षण मिळालेले नाही त्यातच या प्रवर्गात मराठा समाज बांधवांचा सरसकट समावेश करण्याचा अध्यादेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढला आहे, ओबीसी समाजाला शंभर टक्के आरक्षण मिळाले पाहिजे परंतु ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये अशीच आमची भूमिका आहे, राज्य सरकारने गठित करण्यात आलेली शिंदे समिती रद्द करावी यासाठी आज वडवणी तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले या शिष्टमंडळात ओबीसी नेते बी एम पवार, संजय भाऊ आंधळे, नागेश डिगे, विठ्ठलराव भुजबळ, वैजिनाथ शिंदे सर, सुग्रीव मुंडे,राजेभाऊ पवार, नारायण डिगे, रविंद्र मुंडे, अरुण मुंडे, गिण्यांदेव राठोड, कचरू जाधव, परमेश्वर राऊत,बालाजी चाटे, गणेश चोले, पप्पू ढोले,सुशील सुरवसे , विठ्ठल बहिरे, संपत चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, संतोष लाटने, शहादेव राठोड,प्रा. डोईफोडे, अरुण गुरसाळी, निवांत दराडे यांच्या सह अनेक ओबीसी समाज बांधव सहभागी झाले होते.



ग्रामीण भागातील महिलांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ घेऊन आत्मनिर्भर व्हावे - निशा सावरकर



दै.जनप्रभात
कामठी:-नंदू कोल्हे
-=---------------

ग्रामीण भागातील महिलांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध महत्त्वकांशी योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेऊन आत्मनिर्भर होण्याचे आवाहन नागपूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष निशा सावरकर यांनी कामठी तालुक्यातील पवनगाव ग्रामपंचायत च्या वतीने आयोजित महिला मेळाव्यात मार्गदर्शन करताना व्यक्त केले पवनगाव-- धारगाव गट ग्रामपंचायत च्या वतीने आयोजित महिला मेळाव्याचे उद्घाटन नागपूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष निशा सावरकर यांचे हस्ते दीप प्रज्वलन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून करण्यात आले यावेळी भाजप नागपूर जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष अनुराधा अमीन प्रदेश भाजप युवा मोर्चा पदाधिकारी अंजली कानफाडे, चित्राताई निधान, नागपुर जिल्हा महिला आघाडी भाजप उपाध्यक्ष लतेशरी काळे ,कामठी तालुका भाजप महामंत्री मंगलाकार कारेमोरे, तालुका भाजप महिला आघाडी अध्यक्ष प्रांजल वाघ, तरोडीच्या सरपंच आरती चीकटे ,पवनगावच्या सरपंच नेहा किरण राऊत ,कडोलीच्या माजी सरपंच नानूताई ठाकरे उपस्थित होते महिला मेळाव्यात महिलांसाठी एकल व समूह नृत्य, समूहगीत, संगीत खुर्ची, पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला कार्यक्रमात मार्गदर्शन करताना निशा सावरकर व अमीन अनुराधा अमीन म्हणाल्या ग्रामीण भागातील महिलांनी केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध महत्त्वकांसी योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ घेऊन आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन सरपंच नेहा किरण राऊत यांनी केले कार्यक्रमाला ग्रामीण भागातील महिला ,बचत गट व अंगणवाडी सेविका, मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

पूर्णा पोलीस उपविभागीय अधिकारी समाधान पाटील तर पोलीस निरीक्षक विलास गोबाडे

दै, जनप्रभात
परभणी अरविंद कांबळे

पूर्णा, पोलीस उपविभागीय अधिकारी म्हणून समाधान पाटील तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून विलास गोबाडे नुकतेच रुजू झाले. पोलीस खात्यातील विविध अधिकाऱ्यांचे बदल्यांचे सत्र चालू आहे.



असेच पूर्णा शहरातील उपविभागीय अधिकारी ब्रह्मदेव गावंडे यांची बदली झाल्यामुळे त्यांच्या ठिकाणी रत्नागिरी येथून बदली होऊन आलेले समाधान पाटील रुजू झालेले आहेत. तर पूर्णा स्थानकाचे पोलीस निरीक्षक प्रदीप काकडे यांची बदली झाल्यामुळे त्यांच्या ठिकाणी नांदेड होऊन बदली होऊन आलेले विलास गोबाडे हे रुजू झाले आहेत. अल्पशा काळामध्ये पूर्णा शहरांमध्ये पोलीस निरीक्षक प्रदीप काकडे यांनी चांगले कार्य करून आपली वेगळीच छाप सोडून गेले. पोलीस ठाणे एक मंदिरासारखे करून त्यांनी पोलीस स्थानकाचा कायापालट केला. एक जबाबदार अधिकारी तसेच एक आदर्श व्यक्तिमत्व पूर्णा जनतेच्या आठवणीत असेल. असेच कार्य नांदेड जिल्ह्यातून आलेले विलास गोबाडे यांनी करावे असे मत पूर्णा जनसामान्यातून येत आहे . तसे पाहिले तर विलास गोबाडे यांनी सुद्धा विविध पोलीस ठाण्यामध्ये केलेले आहे. त्यांचेही कार्य चांगले आहे. त्यांनी सुद्धा ज्या ज्या ठिकाणी काम केले त्या त्या ठिकाणी गुन्हेगारीवर वचक ठेवलेली आहे. तरीपण उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील तसेच पोलीस निरीक्षक विलास गोबाडे यांनी सुद्धा कायदा व सुव्यवस्था चांगल्या प्रकारे ठेवतील अशी अपेक्षा पुरणे करांनी व्यक्त केली आहे.

गर्भपात करणा-या बकवालनगरातील केंद्रावर पथकाचा छापा ; आशा कार्यकर्तीवर गुन्हा दाखल

दै.जनप्रभात

वाळूज - तपासणीच्या नावाखाली महिलांचा अवैधरित्या गर्भपात करणार्या केंद्राचा वैद्यकीय पथकाने पर्दाफाश केला आहे. चक्क आशा कार्यकर्तीच चालवित असलेल्या केंद्रावर शासकीय वैद्यकिय अधिकार्यांनी छापा मारून बिंग फोडले आहे.पथकाने सदरचा छापा वाळूज पोलिसांच्या मदतीने बुधवार (दि.३१) जानेवारी रोजी सायंकाळी ६:२५ वाजता वाळूजनजीकच्या बकवालनगरात मारला आहे. याप्रकरणी सदर केंद्रचालक आशा कार्यकर्तीवर गुन्हा दाखल केला आहे. याविषयी पोलिसांनी सांगितले की, दक्ष नागरिकांनी याविषयीची एक तक्रार हेल्पलाईनव्दारे थेट पुणे येथे केली होती. त्याचा अहवाल छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात प्राप्त झाला होता.त्यानुसार जिल्हा चिकित्सकांच्या गुप्त आदेशान्वये गंगापूरचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.रमेश पवार यांनी यासाठी रूग्णालयाचे एक पथक नियुक्त केले. त्यांनी सोबत वैद्यकिय अधिकारी डॉ.सुदाम लगास आणि काही पंच घेऊन वाळूज पोलिसांच्या मदतीने वाळूजनजीकच्या बकवालनगरात बुधवारी सायंकाळच्या वेळेत सापळा लावून सदर केंद्रावर छापा टाकला. त्या ठिकाणी चक्क एक आशा कार्यकर्ती आशा जाधव ही महिला स्वत:च्या घरावर सुरभी मदर केअर सेंटर या नावाने नामफलक लावून गर्भपात केंद्र चालवत असल्याचे पथकाच्या निर्देशनात आले. त्या ठिकाणी सदर महिला गर्भ महिलांची तपासणी करीत असल्याची माहिती मिळाली.



पथकाने घराची झडती घेतली असता काही साहीत्य आढळून आले.त्यात गर्भपातसाठी लागणारे इंजेक्शन, काही औषधासह गर्भपात करण्यासाठी लागणारी किटही जप्त करण्यात आली. बकवालनगर हे ग्रुप ग्रामपंचायत जोगेश्वरी अंतर्गत येते.या प्रकाराने वाळूज भागात मोठी खळबळ उडाली आहे.शासनाच्या कल्याणकारी योजनाचे काम करणार्या आशा कार्यकर्तीकडूनच अशा प्रकारचे गैरकृत्य केल्याची चर्चा या भागात खंमगपणे चालू आहे.याविषयी उपजिल्हा रूग्णालय गंगापूरचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.रमेश लक्ष्मण पवार यांनी वाळूज पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.त्यावरून पोलिसांनी आशा कार्यकर्ती वैशाली जाधव रा.बकवालनगर,वाळूज ता.गंगापूर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.सदरची आशा कार्यकर्ती पोलिसांना गुंगारा देत असून पोलिस तिचा शोध घेत असल्याची माहीती पोउपनि. शंकर शिरसाठ यांनी दिली आहे.

कष्टातुन चेहऱ्यावर आलेले हसू चिंतरन टिकते - डॉ निलेश साबळे

सोनईत ५ दिवसीय यशोरंग कार्यक्रमास सुरवात

दै.जनप्रभात

नगर /भेंडा : मुळा एज्युकेशन सोसायटी सोनईच्या ४६ व्या वर्धापनदिनानिमित्त उपाध्यक्ष उदयन गडाख यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या ५ दिवसीय कार्यक्रमाचा शुभारंभ चला हवा येऊ द्या फेम अभिनेते डॉ .निलेश साबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना प्रमुख पाहुणे डॉ. निलेश साबळे म्हणाले जीवनात आपल्या आवडीच्या क्षेत्रात झोकून देऊन काम करा यश तुमच्या पायांवर लोटांगण घालील. जेथे आपण घडलो त्या परिसराला कधीही विसरू नका. कामात सातत्य ठेवा.कुठलेही काम छोटे नसते आपल्यामुळे कामाला प्रतिष्ठा प्राप्त होते. कष्ट करण्यास घाबरू नका कष्टाने आलेले हसू चेहऱ्यावर चिरंतन टिकते असे डॉ. निलेश साबळे म्हणाले व सोनई सारख्या ग्रामीण भागात मुळा एज्युकेशन सोसायटी विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण ज्ञान देण्यासाठी प्रयत्नशील आहे हे पाहून आनंद वाटला असे म्हटले. व उपाध्यक्ष उदयन गडाख यांच्या कार्यक्रमाच्या नियोजनाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनायक देशमुख यांनी केले याप्रसंगी माजी विद्यार्थी व अहमदनगरचे जिल्हा कृषी अधीक्षक सुधाकर बोराळे, राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक संतोष उंडे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. निवेदिता उदयन गडाख,कु नेहल प्रशांत गडाख,सचिव उत्तमराव लोंढे,नानासाहेब रेपाळे,भाऊसाहेब गवळी,डॉ रंगनाथ मते आदींसह संस्थेचे विश्वस्त,कार्यकारी समिती सदस्य,शिक्षक ,पालक ,विद्यार्थी, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलतांना उपाध्यक्ष उदयन गडाख म्हणाले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केजी टू पी जी पर्यंतचे शिक्षण परिसरात उपलब्ध व्हावे या हेतूने मा. खा. यशवंतराव गडाख यांनी ४५ व्या वर्षी कारखान्याच्या खोल्यामध्ये पब्लिक स्कुलची सुरुवात करून केलेली संस्थां आज जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेर शिक्षण क्षेत्रात काम करते आहे . ही अभिमानास्पद बाब आहे. आ. शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थेचे अध्यक्ष प्रशांत गडाख यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक भान जपत संस्था कार्यरत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व कलागुणांना व्यासपीठ म्हणून यशोरंग महोत्सवाचे आयोजन केलें असल्याचे सांगितले व संस्था वाटचालीत सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी मुळा एज्युकेशन सोसा सोनईचे विविध क्षेत्रात उच्च पदावर असलेले माजी विद्यार्थी, गुणवंत विद्यार्थी,पेटंट व पी एच डी मिळवलेले शिक्षक तसेच देणगीदार यांचा डॉ .निलेश साबळे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

डॉ. निलेश साबळे यांचा संकल्प -
सोनई येथील आयोजित कार्यक्रमात डॉ. निलेश साबळे यांनी मरणोत्तर नेत्रदान संकल्प फॉर्म भरला यावर साक्षीदार म्हणून युवा नेते उदयन गडाख यांनी सही केली. डॉ. निलेश साबळे यांनी प्रतिष्ठानचा नेत्रदान संकल्प फॉर्म भरून काम करण्यास प्रेरणा दिली. असे उदयन गडाख म्हणाले.



सडे सोसायटी चेअरमनपदी भिमराज घोरपडे

व्हा. चेअरमनपदी इंदूबाई वाघ ; दोन्ही निवडी बिनविरोध

दै.जनप्रभात

राहुरी : तालुक्यातील सडे विविध कार्यकारी सेवा सोसायटी चेअरमनपदी भिमराज घोरपडे तर व्हा. चेअरमनपदी इंदुबाई तुकाराम वाघ यांची एकमताने



बिनविरोध निवड करण्यात आली. रोटेशन पद्धतीने चेअरमन व व्हा. चेअरमन यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या चेअरमन पदासाठी भिमराज घोरपडे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांना सूचक म्हणून दत्तात्रय रामदास धोंडे होते. तर सर्जेराव पानसंबळ हे अनुमोदक होते. व्हा.चेअरमनपदी निवड झालेल्या इंदुबाई तुकाराम वाघ यांना सूचक म्हणून दत्तात्रय पानसंबळ हे होते. तर अनुमोदक म्हणून गोरक्षनाथ धोंडे हे होते. संस्थेचे सचिव कदम भाऊसाहेब व कल्हापूरे भाऊसाहेब यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडली. यावेळी पंडीतराव धोंडे, धीरज पानसंबळ, अरुण पानसंबळ, दशरथ धोंडे, सुभाष धोंडे, बापूसाहेब तनपुरे, प्रकाश धोंडे, गणेश घोरपडे, विक्रम फाटक, गणेश वाघ, सतिष वाघ, प्रकाश वाघ, रविंद्र वाघ.अनिल वाघ. बाळासाहेब लाहारे.फकिरा पानसंबळ.अमोल धोंडे. शरद खर्डे. पांडुरंग घोरपडे. मोहन काळे. दत्ता पटेकर. प्रमोद धोंडे श्रीरंग पानसंबळ. आल्ताब पठाण. संभाजी लहारे. कलीम पठाण. कृष्णा धोंडे. दतात्रय ढमढेरे, संभाजी लहारे, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंटरमिजिएट परीक्षेत शहरटाकळी विद्यालयाचे यश

दै.जनप्रभात

भाविनिमगाव : शासकीय चित्रकला इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेमध्ये शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. यातए ग्रेड - ठोंबळ शक्ती राजू, ठोंबळ श्रुती बाळासाहेब, बोरुडे वैष्णवी रामदास या तीन विद्यार्थिनींनी ए ग्रेड मिळवली . बी ग्रेड - ऋतुजा बडे,श्रावणी खरड, आराध्या गादे,वैष्णवी खरड, चैताली लोढे, वैष्णवी मोटे,प्राची मुके,अंकिता निकम, सार्थक पवार शुभांगी पवार, रेवती शेळके, चैतन्य तूपसैदर, हर्षल वैद्य तर सी ग्रेड - आर्यन अडकिते, श्रावणी चिकणे, रूपाली घनवट, श्रद्धा घनवट, प्रियंका खरड, जागृती कोल्हे, अश्विनी कुंडकर, आरती लोढे, आदिती मगर, साक्षी मगर,ईश्वरी मोटे,श्रुती मोटे,मयुरी नवले,सृष्टी निंबाळकर,प्राची फटांगडे, शुभांगी राजळे, श्रावणी रोकडे, सृष्टी शेळके, ज्ञानेश्वरी ठोंबळ या १९ विद्यार्थिनींनी क श्रेणी मिळवली आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना विद्यालयाचे कलाशिक्षक संतोष राऊत यांचे मार्गदर्शन लाभले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे प्रमुख अॅड. डॉ. विद्याधर काकडे , जि.प.सदस्या सौ.हर्षदाताई काकडे,विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे,संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मणराव बिटाळ,संस्थेच्या शैक्षणिक विभाग प्रमुख वंदना पुजारी, विद्यालयाचे प्राचार्य कांतेश्वर ढोले,पर्यवेक्षिका अंजली चिंतामण,संस्था प्रतिनिधी अनिल मगर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक , पालक यांनी अभिनंदन केले आहे.



कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांसाठी १३ कोटींचा निधी - आ. निलेश लंके

दै.जनप्रभात

पारनेर - कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्यासाठी पारनेर-नगर मतदार संघातील ११ गावांसाठी १२ कोटी ९२ लाख १६ हजार ४६८ रूपयांचा निधी मंजुर करण्यात आल्याची माहिती आमदार नीलेश लंके यांनी दिली. छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सु.पा.कुशिरे यांनी ० ते १००हेक्टर सिंचन क्षमतेच्या नगर जिल्हयातील पारनेर व नगर तालुक्यातील कोल्हापूर पध्दतीच्या ११ योजनांना प्रशासकिय मंजुरी दिली आहे. प्रशासकिय मान्यता अंदाजपत्रकाप्रमाणे या योजनांची एकूण साठवण क्षमता ७३७.७३ स. घ. मी असून नियोजित सिंचन क्षमता २५४ हेक्टर इतकी आहे. आ. लंके म्हणाले, विविध विकास कामांसाठी कोटयावधींचा निधी मंजुर करण्याबरोबरच सिंचनाकडेही आपले लक्ष असून सिंचन क्षमता वाढवून शेतकरी वर्गाला समृध्द करण्याचा आपला प्रयत्न आहे. यापुढील काळातही सिंचन योजनांसाठी निधी खेचून आणण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. बंधारे मंजुर झालेली गावे व त्यासाठी मंजुर निधी पुढीलप्रमाणे वडनेर बुद्रुक बाबर मळा १ कोटी ६२ लाख ५० हजार ५२३, रूईछत्रपती वाबळे वस्ती १ कोटी २३ लाख ९ हजार ५६४,गटेवाडी हडकी दरा १ कोटी ४६ लाख ८६ हजार ३८ रांधे कॅनॉलजवळ १ कोटी ३० लाख ८२ हजार ९६५, पिंपळगांव कौडा ता. नगर स्मशानभुमीजवळ १ कोटी ६ लाख ५ हजार ९६३, खडकी, ता. नगर स्मशानभुमीजवळ ९० लाख ४३ हजार ६०९, भोरवाडी ता. नगर भिरभिरा कोपरा १ कोटी ११ लाख ३ हजार ९६५, कामरगांव ता. नगर शाहू डोह १ कोटी १२ लाख ६२ हजार ११२, बाबुर्डी काकडे मळा १ कोटी२१ लाख ७३ हजार ३३३, दैठणे गुंजाळ भाळवणी रस्ता ८४ लाख ४८ हजार ४९६, पिंपळनेर वडूले वस्ती १ कोटी लाख ४९ हजार ९२७.

साईनाथ भिसे उपाध्यक्षपदी

तालुका प्रतिनिधी

राहुरी : राहुरी खुर्द येथील युवा कार्यकर्ते साईनाथ भिसे यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा राहुरी तालुका उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल निवडीचे प्रमाणपत्र देताना प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर ,जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले ,भाजप तालुका अध्यक्ष सुरेश बानकर , युवा मोर्चा तालुका अध्यक्ष धिरज पानसंबळ, निसार शेख, अशोक तोडमल, अक्षय तनपुरे, ज्ञानेश्वर भिंगारदे आदि उपस्थित होते.



राहुरीत करियर गायडन्स सेमिनारचे आयोजन

अमन सोशल असोसिएशन आयोजक ; दहावी व बारावी विद्यार्थी व पालकांना होणार मार्गदर्शन

दै.जनप्रभात

राहुरी : तालुक्यांतील विद्यार्थी व पालकांसाठी दहावी व बारावी नंतर पुढे काय ? यासाठी अमन सोशल असोसिएशन राहुरीच्या वतीने मोफत करियर गायडन्स सेमिनारचे रविवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी राहुरीत आयोजन करण्यात आल्याची माहिती असोसिएशनचे अध्यक्ष इब्राहीम शेख यांनी दिली.राहुरी येथील श्री पंढरी मंगल कार्यालय येथे दुपारी २ वाजता करियर गायडन्स सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या सेमिनार मध्ये विद्यार्थी व पालकांमध्ये दहावी व बारावी नंतर पुढे काय करावे हा मोठा प्रश्न असतो. यासाठी विद्यार्थ्यासाठी मेडिकल, इंजीनियरिंग, स्पर्धा परीक्षा, विविध क्षेत्रातील अधिकारी, नेव्ही, आर्मी, एअर फोर्स, पायलट, बिजनेस, हॉटेल मॅनेजमेंट, अग्रिकल्चर, कृषी. कला (डिझाईन) संगीत, क्रीडा क्षेत्रातील विविध कोर्सेस, आयटीआय, अशा अनेक क्षेत्रात प्रवेश घेण्यासाठी महाराष्ट्रातील नावाजलेल्या अॅकेडमीच्या तज्ञ प्राध्यापकांचे विद्यार्थ्यासाठी करिअर मार्गदर्शन होणार आहे.या सेमिनार मध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी लातूर येथील प्रा. मोटेगावकरचे -आरसीसी अॅकेडमी, औरंगाबाद येथील गरुड झेप अॅकेडमी (शाखा - अहमदनगर), कृषी विद्यापीठ राहुरी येथील कृषी शिक्षण विभाग, पुणे येथील आय आय बीएम ग्रुप इन्स्टिटयूट, राहुरी येथील आय टी आय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहमदनगर आर्ट (डिझाईन), संगीत क्षेत्रातील प्राध्यापक यांचे सखोल मार्गदर्शन मिळणार आहे. या सेमिनारसाठी विद्यार्थ्यांबरोबर पालकही येऊ शकतात. विद्यार्थ्यांनी सेमिनारसाठी येताना वही, पेन बरोबर घेऊन यावे. करिअर मार्गदर्शन सेमिनारसाठी विद्यार्थ्यांसह पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थीत रहावे असे आवाहन असोसिएशनचे सेमिनारचे प्रमुख समीर शेख , बादशाह शेख , अफजल पठाण, असिफ पटेल , अब्दुल आतार, आजम पठाण, डॉ. जाकीर शेख, समीर गफुर शेख, डॉ. फैरोज शेख, फहीम शेख आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



शेवगाव काकडे विद्यालयाचा इंटरमिजिएटचा शंभर टक्के निकाल

दै.जनप्रभात

शेवगाव : कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी सन २०२३ मध्ये घेतलेल्या शासकीय रेखाकला परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत ४४ पैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. विद्यार्थी यांना कलाशिक्षक शितलकुमार गोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

'ए' श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी - आंधळे प्रथमेश, भागवत अनुष्का, देशमुख अथर्व, ढाकणे समृद्धी, मरकड संस्कृती, सातपुते हर्षदा. **'बी' श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी** - भागवत अनुष्का अविनाश, भवर पायल, बोडखे तनुजा, दारकुंडे आरती, दसपुते धनश्री, घुले वेदांती, गिऱ्हे गायत्री, केदार दिव्या, नांगरे अंजली, पवार श्रावणी, फलके वेदांती, साळवे प्रमोद, शेकडे कार्तिकी .



शेवगाव : इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेमधील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप व अभिनंदन कार्यक्रम प्रसंगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष अॅड.डॉ. विद्याधर काकडे, विद्यालयाचे प्राचार्य संपतराव दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, कलाशिक्षक शीतलकुमार गोरे, पर्यवेक्षक हरिश्चंद्र मडके, प्रा. सुनील आढाव, कल्पेश भागवत व गुणवंत विद्यार्थी.

शाळेच्या मनमानी कारभाराला वाळूजकर कंटाळले

दै.जनप्रभात

वाळूज - येथील जि.प.प्रशाला व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराने कळस गाठला आहे. शुक्रवार(दि.२६) रोजीच्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला दोन्ही माध्यमाच्या शाळेने अनेकांना निमत्रंण देणे टाळल्याने वाळूजकरात संतापाचे वातावरण आहे. त्यामुळे केवळ झेंड्याला सलामी देऊन पुढच्या कार्यक्रमावर ग्रामस्थांनी चक्क बहिष्कार टाकला होता.शिक्षण क्षेत्रातील मनमानीची चर्चा येथे चांगलीच रंगली आहे. याविषयी माहीती अशी की,वाळूजच्या जिल्हा परिषद प्रशालेचा ढिसाळ कारभार शुक्रवारी चव्हाट्यावर आला आहे.राष्ट्रीय कार्यक्रमाला प्रतिष्ठित ग्रामस्थासह शालेय समिती पदाधिकार्यासह अनेकांना शाळेतील कार्यक्रमाचे निमत्रंण देण्याची प्रक्रिया गेल्या ५० वर्षापासून सुरू आहे.मात्र प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला व्यवस्थापनाने केवळ मोजक्याच नागरिकांना शाळेत बोलावले असल्याचा आरोप अनेकांनी केला आहे.त्यामुळे शालेय समिती सदस्यासह ग्रामस्थांनी झेंड्याला सलामी दिल्यानंतर शाळेच्या प्रागंणातून काढता पाय घेतला. जवळपास वर्षभरापासून प्रशालेत समितीची एकही बैठक झाली नसून शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत गवळी यांच्या कामाविषयी अनेकजण नाराज आहेत.याविषयी समितीने १ सप्टेबर २०२३ रोजी शिक्षणाधिकार्यासह मुख्यकार्यकारी अधिकार्याकडे तक्रार करूनही उपयोग झाला नसल्याचे पदाधिकारी सांगतात.निवेदनात असंख्य तक्रारीचा पाढा गिरविण्यात आला होता. याविषयी अनेकात संताप व्यक्त होत असून सदर मुख्याध्यापकाची बदली करून त्यांच्या जागेवर वर्ग -२ च्या मुख्याध्यापकाची नियुक्ती करावी असा ठरावही ग्रामस्थांनी ग्रामसभेत घेतला आहे. सर्जेराव भोंड,सदस्य शालेय समिती- शाळेच्या ढिसाळ कारभाराचा मी जाहीर निषेध करतो. संजय खोचे,माजी उपसरपंच- राष्ट्रीय कार्यक्रमाला शाळेने नेहमीप्रमाणेच निमत्रंण द्यायला हवे होते. बबन गायकवाड,उपाध्यक्ष शालेय समिती- सबंधितांना वेळोवेळी समज देऊनही त्यांच्यात फरक दिसून येत नाही.वरिष्ठांनी सदर मुख्याध्यापकाना अन्य शाळेत पाठवून त्यांच्या जागेवर अन्य मुख्याध्यापक नियुक्त करावा. मुकेश बोहरा,चेअरमन विकासो- यावेळेस मलाही शाळेचे निमत्रंण आले नाही. अशाच प्रकारच्या प्रतिक्रिया शेख जमील अहमद, ज्ञानेश्वर बोरकर,विजय साबळे,नंदु राऊत, माणिक

जिजामाता विद्यालयास आयएसओ मानांकन

दै.जनप्रभात

भेंडा : श्री.मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास इंटरनॅशनल अॅक्रिडेशन फोरम या आंतरराष्ट्रीय संस्थेचे आयएसओ ९००१-२०१५ चे प्रमाणपत्र नुकतेच प्राप्त झाले. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्र घुले यांनी हे नामांकन पत्र विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री सरवदे यांना सुपुर्द केले. यावेळी शिक्षण संस्थेचे प्रशासकिय अधिकारी प्रा. भारत वाबळे, पर्यवेक्षक प्रा. बाळासाहेब मोटे व प्रा.बाळासाहेब उगलमुगले, प्रा.सुधाकर नवथर, गोरक्षनाथ म्हस्के, डॉ.राजेंद्र गवळी आदी उपस्थित होते.विद्यालयाचे दैनंदिन कामकाज, कार्यालयीन कामकाज, उपलब्ध साधन सामग्री, शैक्षणिक तसेच विविध क्रीडा प्रकारच्या सुविधा, ग्रंथालय, प्रयोगशाळा, वसतिगृह सर्व बाबींचे दिल्ली येथील इएमएस सर्टिफिकेशन व रॉयल असेसमेंट प्रा. लि. या नामांकित संस्थेमार्फत परीक्षण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे मानांकन प्राप्त झाले आहे. नामांकनामुळे विद्यालयाच्या लौकिकात आणखी एक भर पडली. आयएसओ संदर्भात समन्वयक म्हणून डॉ.राजेंद्र गवळी यांनी काम पाहिले. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील, मा.आ.चंद्रशेखर घुले पाटील, मा.आ.पांडुरंग अभंग , डॉ क्षितीज घुले पाटील , ज्येष्ठ विश्वस्त अॅड देसाई देशमुख, शिक्षण संस्थेचे सचिव अनिल शेवाळे, सहसचिव रविंद्र मोटे यांच्यासह विश्वस्त मंडळ यांनी प्रशासकिय अधिकारी, प्राचार्य, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.





दै.जनप्रभात

वडुले खुर्द : येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह निमित्त संत वामनभाऊ महाराजांचे रांगोळी चित्र रेखाटले आहे. आरती धनंजय रणमले यांनी . अगदी हुबेहूब रांगोळी रेखाटन केले आहे हे रांगोळी चित्र आहे हे पाहताना क्षणभर विसर पडल्याशिवाय राहत नाही.

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री राम करण यादव यांनी बडनेरा – वर्धा – नागपूर विभागाची व्यापक तपासणी केली

दै.जनप्रभात

नागपूर/ दिलीप येवले





मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांनी २ फेब्रुवारी २०२४ रोजी बडनेरा – वर्धा–नागपूर विभागाची बारकाईने तपासणी केली. बडनेरा–नागपूर विभागातील विविध ठिकाणी प्रवासी सुविधा, पायाभूत सुविधा आणि कार्यक्षमतेचे मूल्यांकन करणे या तपासणीचे उद्दिष्ट होते. . तपासणीतील ठळक मुद्दे: टिमटाळा स्थानकाच्या तपासणीदरम्यान, श्री यादव यांनी स्टेशनच्या सुविधा, कॉलनी पायाभूत सुविधा आणि (झख) प्रणालीची तपासणी यावर लक्ष केंद्रित केले. मालखेड आणि चांदूर दरम्यान, महाव्यस्थापक यांनी वळण क्रमांक ७ आणि गँग युनिट क्रमांक ४ ची तपासणी केली, ऑपरेशनल अचूकतेच्या महत्त्वावर जोर दिला. तपासणीमध्ये (डक्ह) क्रमांक ७२ च्या परीक्षेचा समावेश होता, ज्यामध्ये दिपोरी आणि धामणगाव दरम्यान सुरक्षा आणि कार्यक्षमता भर टाकण्यात आली. श्री यादव यांनी ट्रॅकच्या परिस्थितीचे बारकाईने परीक्षण केले, ३च्या लाईनच्या कामाच्या प्रगतीचे निरीक्षण केले आणि वेगवेगळ्या स्थानकांवर सुरू असलेल्या घडामोडींचे मूल्यांकन केले. धामणगाव स्टेशनवर, श्री यादव यांनी अमृत भारत योजनेंतर्गत कामाचे मूल्यमापन केले, क्रॉसिंग क्रमांक १०२/इ ची पाहणी केली आणि गुड्स शेड आणि ढढ्ढ डेपोची पाहणी केली. वर्धा येथे, श्री यादव यांनी स्टेशन परिसर, अपघात निवारण ट्रेन (एआरटी), अपघात निवारण वैद्यकीय उपकरणे (एआरएमई) आणि रूमिंग रूमची पाहणी केली. या व्यतिरिक्त, त्यांनी खासदार/आमदार प्रतिनिधी व श्री रामदासजी आंबटकर (विधान परिषद सदस्य) आणि स्थानिक व्यापाऱ्यांशी संवाद साधला. बुटीबोरी येथे, श्री यादव यांनी स्टेशन, पॉइंट क्रमांक १०५/इ, डएग क्रमांक ७ (घा८०८/६४१), बुटीबोरी ठजइ आणि ढच् साईडिंगची पाहणी केली. तसेच नागपुरात श्री यादव यांनी प्रसारमाध्यमे आणि पत्रकार प्रतिनिधी आणि संघटनांशी संवाद साधला. श्री राम करण यादव यांचा रेल्वेच्या कामकाजाच्या विविध पैलूंवर देखरेख करण्याचा दृष्टिकोन मध्य रेल्वेची उत्कृष्टता आणि सतत सुधारणा करण्यासाठीचे समर्पण प्रतिबिंबित करतो. सर्वसमावेशक तपासणी सुरक्षित, कार्यक्षम आणि प्रवासी–अनुकूल सेवा प्रदान करण्याच्या रेल्वेच्या वचनबद्धतेची पुष्टी करते.

जिल्ह्यातील तीन उद्योकांना उद्योग पुरस्कार प्रदान





दै.जनप्रभात

नागपूर,/दिलीप येवले

सन – २०२२ वर्षासाठी जिल्ह्यातील उत्कृष्ट उद्योजकांचा गौरव करीत प्रथम पुरस्काराचे मानकरी म्हणून शुभलक्ष्मी फूडस् इंडस्ट्री यांची निवड करण्यात आली असून द्वितीय पुरस्कार ब्रम्हाणी इंडस्ट्रीज आणि डॅफोडिल्स एनग्रेवर्स इंडिया प्रायव्हेट लिमीटेड यांना विभागून देण्यात आला आहे. लघु उद्योग सुरु करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व त्यांनी संपादन केलेल्या यशाची साभार पोच द्यावी, या हेतूने राज्य शासनाचे जिल्हा पातळीवर जिल्हा पुरस्कार योजना सुरु केली आहे. प्रथम पुरस्कारप्राप्त उद्योजकास १५ हजार रुपये, गौरव चिन्ह व द्वितीय पुरस्कार १० हजार, गौरव चिन्ह देवून पुरस्कारीत करण्यात येते. पुरस्कारासाठी उद्योजकांची निवड, विकासाचा वेग, तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादन विकास व गुणवत्ता नियंत्रण, आयात, निर्यात, उत्पादनातील बदल, व्यावस्थापन आदि निकषावर केली जाते.

लोकप्रिय घोषणांना फाटा देणारा 'अर्थ–संकल्प'

महिला, शेतकरी, तरुण आणि गरीब केंद्रस्थानी

दै.जनप्रभात

नवी दिल्ली: केंद्रीय अर्थमंत्री सीतारमन यांनी गुरूवार १ फेब्रुवारी रोजी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील शेवटचा म्हणजे अंतरिम अर्थसंकल्प करताना त्यांनी केंद्र सरकारच्या मागील १० वर्षांमधील विकासकामांचा आढावा घेतला अंतरिम अर्थसंकल्पात गरीब, तरुण शेतकरी आणि महिला (ऋअछ) या चार स्तंभांना केंद्रस्थानी मानून घोषणा केल्या पंतप्रधानआवास योजना ग्रामीणअंतर्गत तीन कोटी घरे बांधण्यासह सौरऊर्जेच्या माध्यमातून एक कोटी घरांना सौरऊर्जेडरे दरमहा ३०० युनिट मोफत वीज, आयकर स्लॅबमध्ये कोणताही बदल नाही तसेच पायाभूत सुविधांसह अनेक क्षेत्रांसाठी घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सरकारने कोणतीच मोठी घोषणा न करता परंपरेचे पालन केले लोकसभा निवडणुका लवकरच होत असून त्या पृष्ठभूमिवर अर्थमंत्री निर्मला सीतारमन अंतरिम अर्थसंकल्पात काय घोषणा करतात याकडे देशवासीयांचे लक्ष लागले होते. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पीय भाषणात सांगितले की, हा अंतरिम अर्थसंकल्प ४ क्षेत्रांवर केंद्रित आहे. गरीब, महिला, तरुण आणि अन्नदाता. अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी ५८ मिनिटांच्या भाषणात केलेल्या अनेक घोषणात काहीही महाग झाले नाही किंवा काहीही स्वस्तही झाले नाही.

पंतप्रधान आवास योजना-ग्रामीणअंतर्गत तीन कोटी घरे

मध्यमवर्गीयांसाठी योजना तयार केली जाईल. भाड्याची घरे, झोपडपट्ट्या आणि अनियमित घरांमध्ये राहणाऱ्या लोकांना नवीन घर विकत घेण्याची किंवा बांधण्याची संधी मिळेल. पंतप्रधान आवास योजना–ग्रामीण याअंतर्गत तीन कोटी घरे बांधली जाणार आहेत. त्यापैकी दोन कोटी घरे येत्या पाच वर्षांत बांधण्यात येणार असल्याची माहिती अर्थमंत्री सीतारमन यांनी दिली.

'जय जवान, जय किसान, जय विज्ञान, जय संशोधन'

नवीन तंत्रज्ञान व्यवसायाला मदत करत आहे. लाल बहादूर शास्त्रींनी जय जवान, जय किसानचा नारा दिला होता. अटलजींनी जय जवान, जय किसान, जय विज्ञानाचा नारा दिला होता. आता पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जय जवान, जय किसान, जय विज्ञान, जय अनुसंधानचा नारा दिला आहे. तंत्रज्ञान क्षेत्रात रस असणाऱ्यांसाठी हा सुवर्णकाळ आहे. १ लाख कोटी रुपयांचा निधी बिनव्याजी किंवा कमी व्याजदराने वितरित केला जाईल. यामुळे दीर्घकालीन आर्थिक मदत मिळेल. यामुळे खाजगी क्षेत्राला मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

महिला, तरुण, गरीब आणि शेतकऱ्यांचा विकासाला प्राधान्य

गेल्या १० वर्षात आम्ही सर्वांसाठी घरे, प्रत्येक घराला पाणी, सर्वांसाठी बँक खाती अशी कामे विक्रमी वेळेत पूर्ण केली आहेत. ८० कोटी लोकांना मोफत रेशन देण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्यात आली. संसाधनांचे वितरण पारदर्शकतेने करण्यात आले आहे. सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी आम्ही विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मते गरीब, महिला, युवक आणि शेतकरी यांच्या विकासावर आमचे लक्ष आहे. त्यांच्या गरजा, त्यांच्या आकांक्षा आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत, असे अर्थमंत्री म्हणाल्या.

पीएम किसान संपदा योजनेचा ३८ लाख शेतकऱ्यांना लाभ

प्रधानमंत्री किसान संपदा योजनेचा ३८ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला असून १० लाख रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत, अशी माहिती अर्थमंत्री सीतारमन यांनी यावेळ दिली. स्वावलंबी तेलबिया अभियानाला बळ दिले जाईल. या अंतर्गत नवीन कृषी तंत्रज्ञान आणि कृषी विम्याला चालना दिली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

आयकर स्लॅबमध्ये कोणताही बदल नाही

अंतरिम अर्थसंकल्पात आयकर स्लॅबमध्ये (आयकर रचना) कोणता बदल करणार याकडे लाखो भारतीय करदात्या विशेषतः पगारदार वर्गाला लक्ष वधले होते. मात्र केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आपल्या अंतरिम अर्थसंकल्पात आयकर स्लॅबमध्ये कोणताही बदल केलेला नाही.

संरक्षण क्षेत्रासाठी ६.२ लाख कोटी -

'' केंद्र सरकारने अंतरिम अर्थसंकल्पात संरक्षणावरील खर्चासाठी ६.२ लाख कोटी रुपये दिले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यात केवळ ०.२७ लाख कोटी रुपयांची



वाढ झाली आहे. सरकारने गेल्या वर्षी संरक्षण बजेटसाठी ५.९३ लाख कोटी रुपये दिले होते. २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ८ टक्के संरक्षणावर खर्च केला जात आहे.

टॉप घोषणा...

* पंतप्रधान आवास योजनेंतर्गत पुढील ५ वर्षांत २ कोटी घरे बांधण्यात येतील.
* रूफटॉप सोलरच्या माध्यमातून ३०० युनिटपर्यंत मोफत वीज.
* लखपती दीदी योजनेंतर्गत ३ कोटी महिलांना रोजगार, शिक्षणासाठी कर्ज.
* गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होऊ नये म्हणून ९ ते १४ वर्षीय मुलींचे मोफत लसीकरण.
* रेल्वेचे तीन कॉरिडॉर विकसित करणार. ४०,००० रेल्वे डबे वंदे भारतप्रमाणे बदलणार.
* रिसर्च व इनोव्हेशनच्या कर्जपुरवठ्यासाठी १ लाख कोटींच्या निधीची तरतूद
* पायाभूत सुविधांवरील खर्चात ११.१% वाढ करत त्यासाठी ११,११,१११ कोटींची तरतूद.

इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन उत्पादन आणि वितरण कंपनीवर

चार भाजप नेत्यांची संचालक म्हणून नेमणूक

मुंबई : लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागलेले असतानाच धक्कादायक बाब समोर आली आहे. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनचे उत्पादन आणि वितरण करणाऱ्या भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड या सरकारी कंपनीवर चार भाजप नेत्यांची संचालक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या नियुक्तीवर माजी केंद्रीय सचिव ई एस शर्मा यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून आक्षेप घेतला आहे. तर विरोधी पक्षांनीही तीव्र प्रतिक्रिया दिल्या आहेत. निवडणूक आयोग या नियुक्तीवर गप्प का आहे,असा सवाल विरोधी पक्षांनी केला आहे. भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड ही सरकारी कंपनी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनचे उत्पादन आणि वितरण करणारी कंपनी आहे. ही कंपनी ईव्हीएम मशीनमध्ये असणाऱ्या चिपसाठीचा गुप्त कोडही तयार करते. अशा कंपनीवर भाजपच्या चार नेत्यांची नियुक्ती करण्यात आली असून या नियुक्तीवर माजी केंद्रीय सचिव शर्मा तसेच विरोधी पक्षांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. तर ईव्हीएम मशीन कशी सुरक्षित आणि विश्वासार्ह असेल ? असा प्रश्न उपस्थित झाल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. याप्रकरणी निवडणूक आयोग गप्प का आहे ? असा सवाल करतानाच तातडीने ॲक्शन घ्या आणि लोकशाही वाचवा, असे आवाहन काँग्रेसचे प्रवक्ते रणदीप सुरजेवाला यांनी निवडणूक आयोगाला केले आहे.

प्रथमेश परदेशीचे सुयश



लाडजळगाव : पुणे जिल्ह्यातील कात्रज येथील आय. सी.ई. कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (कात्रज) या ठिकाणी तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेला तसेच तृतीय वर्षाच्या झालेल्या शालांत परीक्षामध्ये शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील सर्वसामान्य कुटुंबातील प्रथमेश बिरजू परदेशी या विद्यार्थ्याने ७४.६० टक्के गुण मिळवून घवघवीत असे यश प्राप्त केले असून या यशाबद्दल प्रथमेशचे कौतुक होत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले जाते आहे.

राज्यात तब्बल १७,४७१ पोलिसांची भरती होणार

मुंबई : राज्यात पोलीस भरती करण्यास वित्त विभागाने मंजूरी दिली आहे. यामुळे पोलिस भरतीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. राज्यात तब्बल १७४७१ पोलिसांची भरती होणार आहे. पोलीस शिपाई, बँण्डस्मॅन, पोलीस शिपाई चालक, सशस्त्र पोलीस शिपाई व कारागृह शिपाई या पदांची भरती केली जाणार आहे. कंत्राटी भरतीवरुन झाला होता वाद – राज्य सुरक्षा महामंडळाच्या जवानांमधून कंत्राटी भरती करण्याचा गृहखात्याचा प्लान होता. या जवानांना पोलिसांसारखे प्रशिक्षण देऊ कंत्राटी पद्धतीनं ११महिन्यांसाठी भरती केली जाणार होती. पण या निर्णयावरुन विरोधकांनी सरकारवर टीका केली होती. मुंबईसारख्या संवेदनशील शहराची सुरक्षा कंत्राटी पोलिसांवर सोपवणं किती योग्य आहे असा सवाल उपस्थित करण्यात आला होता. पोलीस भरतीमध्ये एमबीए, इंजिनिअर्स तरुणांचे अर्ज –२०१८ च्या पोलीस भरतीत मोठ्या संख्येने उच्च शिक्षित उमेदवारांनी अर्ज भरले होतो. यात अगदी इंजिनिअर्स,एमबीए,एमए,एमएससी,एमकॉम अशी उच्च पदवी घेतलेल्यांची संख्या अधिक होती. १४४९ पेलिस कॉन्स्टेबल पदासाठी मुंबई पोलिसांची भरती पार पडली. ज्यासाठी तब्बल १०९ एमबीए धारकांनी अर्ज केला तर, १ हजार ९७८ एमए, ५४३ एमकॉम, ४२३ इंजिनिअर्स, ६३ एमएसडब्ल्यू, ३० एमसीए अशा पोस्ट ग्रॅज्यूएट्ससहीत हजारो पदवीधारकांनी अर्ज केले होतो.

रेल्वेच्या अंतरिम अर्थसंकल्पात महाराष्ट्राला १५ हजार ५५४ कोटी

दै.जनप्रभात

मुंबई: अर्थमंत्री निर्मला सिमारामन यांनी देशाचा अंतरिम अर्थसंकल्प गुरुवारी संसदेत सादर करण्यात आला. तसेच यावेळी रेल्वेच्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्राला १५ हजार ५५४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. मागील वर्षी महाराष्ट्रात रेल्वेसाठी १३ हजार कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती, अशीही माहिती त्यांनी यावेळी दिली. अर्थसंकल्पातून महाराष्ट्रातील रेल्वे मार्गिकला घसघसशीत निधी आल्याचं चित्र आहे. नवी रेल्वे मार्गिका, दुसरी, तिसरी आणि चौथी रेल्वे मार्गिका पासाठी देखील निधी दिला जाणार आहे. त्याचप्रमाणे कसारा, कर्जत आणि पुणे या रेल्वेयार्डाचं नुतनीकरण केल जाईल, सीएसएमटी, एलटीटीच्या विकासाठी देखील निधी दिला जाणार असल्याचं सागण्यात आलं आहे.महाराष्ट्रातील एकूण सहा नवीन मार्गिकासाठी तरतूद करण्यातआलीये, त्यासाठी जवळपास १ हजार ९४० कोटी रुपयांची तरतूद असणार आहे. तसेच यामध्ये दुसरी, तिसरी आणि चौथी मार्गिका या प्रकल्पांसाठी देखील अर्थसंकल्पात कोट्यावधी रुपयांची तरतूद झालीये. या प्रकल्पांसाठी जवळपास १,६१० तरतूद असणार आहे. तसेच यामध्ये सीएसएमटी म्हणजे छत्रपची शिवाजी महाराज टर्मिनस आणि एलएलटी या स्थानकांच्या विकासकामांसाठी तरतद् आहे.

नवीन रेल्वे मार्गिका –

* नगर बीड परळी रेल्वे मार्ग – २७५ कोटी
* बारामती लोणंद रेल्वे मार्ग ३३० कोटी
* वर्धा नांदेड रेल्वे मार्ग – ७५० कोटी
* सोलापुर समानाबाद तुळजापूर रेल्वे मार्ग – २२५ कोटी
* धुळे नार्थना रेल्वे मार्ग – ३५० कोटी
* कल्याण मुरबाड बारस्ता उल्हासनगर रेल्वे मार्ग – १० कोटी
* राजमनेर मार्गासाठी– ३०० कोटी
* एसएमटी प्लॅटफॉर्म लांबीकरण – १० कोटी
* स्थानक – २ कोटी

संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याची गाळप क्षमता वाढविणार : सचिन घायाळ

संत एकनाथ शेतकरी विकास पॅनल प्रचाराचे शुभारंभ



दै.जनप्रभात

स्व. भाऊराव पाटलानंतर आलेल्या सर्वच संचालक मंडळ व चेअरमन लोकांनी केवळ कारखान्याला लुबाडणूक खाण्याचे काम केले आहे . आप्पासाहेब पाटलांनी तर कारखान्याच्या जीवावर वडिलांची खासदार किंवा स्वतःचे आमदारकी लावल्याचे आरोप संत एकनाथ शेतकरी विकास पॅनलचे प्रमुख सचिन घायाळ केला आहे . संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याची निवडणुकीचा प्रचाराची शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते . यावेळी व्यासपीठावर कारखान्याचे चेअरमन तुषार शिसोदे , संचालक अक्षय शिसोदे ,विक्रम घायाळ , भाऊसाहेब पिसे, सुरज लोळगे , रेखा कुलकर्णी , गणेश पवार यांची उपस्थिती होती . आपल्या भाषणात बोलताना पुढे म्हणाले की, आत्ता प्रत्येक संचालक मंडळाने आपापल्या कार्यकाळात कारखाना कर्जबाजारी केली, मी हा कारखाना भाडेतत्त्वावर चालवण्यास घेतला नसता तर आज पर्यंत हा कारखाना विकला गेला असता. कारखाना चालवताना एक ध्येय असायला हवे, त्यासाठी संचालक मंडळ व चेअरमन हा सुशिक्षित असायला हवे , आणि सर्व गुणसंपन्न सुशिक्षित उमेदवार आमच्या संत एकनाथ शेतकरी विकास पॅनल मध्ये असल्याचे सांगितले. यावेळी संत एकनाथ शेतकरी विकास पॅनलला मतदान करून सर्वच संचालकांना बहुमताने निवडून देण्याचे आवाहन सभासद व मतदारांना केले.

साडे सात हजार टन गाळप क्षमता वाढविणार – चेअरमन सचिन घायाळ

संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याची गाळप क्षमता साडे सात हजार टन क्षमतेने वाढवून त्याच बरोबर डिस्टलेरी व इतर शेती पुरक उद्योग सुरू करणार असल्याचे सांगितले.

सचिन घायाळ यांच्या मुळे कारखान्यास मिळाले जीवदान –

आतापर्यंत सर्व संचालक व चेअरमन यांनी कारखाना कर्जबाजारी करून टाकला होता मात्र सचिन घायाळ यांच्या मुळे कारखान्यास पुन्हा जीवनदान मिळवुन आज शेतकऱ्यांसाठी एक नवसंजीवनी मिळाली आहे.

आश्वी खुर्द येथे मशरूम लागवड कार्यशाळा



दै.जनप्रभात

नगर : प्रवरेच्या कला वाणिज्य विज्ञान व संगणकशास्त्र महाविद्यालय आश्वी खुर्द येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने मशरूम (अळंबी) लागवड कार्यशाळा बुधवार दि. ३१ जानेवारी रोजी उत्साहात संपन्न झाली. यावेळी नूतन कला महाविद्यालय राजापुर येथील उपप्राचार्य व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुभाष वर्पे यांनी विद्यार्थ्यांना मशरूम लागवड व रोजगाराच्या संधी याबाबत आणि मशरूम विषयीचे समज गैरसमज याबाबत उपस्थितीतांना मार्गदर्शन केले तसेच प्रिमियम मशरूम उत्पादक कंपनीचे प्रमुख रवींद्र घाणे यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून मशरूम तयार करण्याच्या साध्या पद्धतीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. देविदास दाभाडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संतोष वर्पे यांनी केले. या प्रसंगी विज्ञान विभागातील डॉ. राजेंद्र गायकर, डॉ. सोमनाथ भुमकर, प्रा. दत्तात्रय लोखंडे , विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. गणेश शेळके, प्रा. विशाल चौधरी, प्रा. विशाल साळवे, प्रा. मोईन पटेल, प्रा. गणेश खेमनर, प्रा. लतिफ शेख, प्रा. मिनिनाथ औताडे, प्रा. योगिता तळेकर, प्रा. वर्षा शिंदे, प्रा. स्वप्नाली त्रिभुवन तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्रिमुर्ती कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय ढोरजळगाव (ता. शेवगाव) येथील विद्यार्थी सोमनाथ काळे, नरेंद्र घोडेचोर यांना प्रातिनिधिक स्वरूपात अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्राजक्ता खळदकर यांनी केले. कार्यशाळेचे आभार डॉ.अविनाश घोलप यांनी केले.



नगर एमआयडीसी पोलीसांची कामगिरी २ दहशत निर्माते जेरबंद

दै.जनप्रभात

नगर : एमआयडीसी परीसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी अवैधरित्या धारदार कोयता व तलवार बाळगुन मोठमोठ्याने ओरडुन दहशत निर्माण करणाऱ्या दोन इसमांना जेरबंद केले आहे. याबाबत हकिगत अशी की, दिनांक ३० जानेवारी रोजी सपोनि माणिक चौधरी प्रभारी एमआयडीसी पोलीस स्टेशन अहमदनगर यांना माळवाडी चौक, वडगाव गुप्ता ता. जि. अहमदनगर येथे एक इसम हातात अवैधरित्या धारदार कोयता बाळगुन मोठमोठ्याने ओरडुन दहशत निर्माण करत आहे. अशी गोपनीय बातमी मिळाल्याने सपोनि माणिक चौधरी यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पथक तयार करुन सदर ठिकाणी पाठवले. सदर ठिकाणी एक इसम हातात धारदार कोयता घेवुन मोठमाठ्याने ओरडुन दहशत निर्माण करुन संशयित रित्या फिरताना दिसला. जळून जात असता त्या इसमास पाठलाग करुन पकडे. सदर इसमाचे नाव नरेष शिरीष रणदिवे, रा. माळवाडी चौक वडगाव गुप्ता ता. जि. अहमदनगर असे सांगितले. त्याच्या हातातील कोयता पोहेकॉ. सांगळे यांनी दोन पंचासमक्ष ताब्यात घेवुन जप्त करण्यात आला.

एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे आणुन त्याचे विरुध्द भारतीय हत्यार कायदा कलमसह महाराष्ट्र पोलीस अधिनियमाप्रमाणे फिर्याद दिली आहे. तसेच सहयाद्री चौक येथे एक इसम हातामध्ये धारदार शस्त्र घेवुन लोकांमध्ये दहशत निर्माण करत आहे. अशी गोपनीय माहिती सपोनि माणिक चौधरी यांना मिळाल्याने सदर ठिकाणी पोलीस स्टेशनचे पथक पाठवुन हातामध्ये धारदार शस्त्र घेवुन फिरणाऱ्या इसमास जागीच पकडले. त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सोमनाथ राजु केदारे रा.उभा मारुतीमागे बोल्हेगाव, गांधीनगर ता. जि. अहमदनगर असे सांगितले. त्याच्या हातातील धारदार शस्त्र पोहेकों सांगळे यांनी ताब्यात घेवुन दोना पंचासमक्ष जप्त केले. त्यानंतर एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे येऊन त्याचे विरुध्द भारतीय हत्यार कायदासह महाराष्ट्र पोलीस अधिनियमा प्रमाणे फिर्याद दिली आहे. सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस अधीक्षक अहमदनगर, प्रशांत खैरे अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर, संपतराव भोसले साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी नगर ग्रामीण विभाग अहमदनगर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. माणिक चौधरी प्रभारी अधिकारी एमआयडीसी पोलीस स्टेशन, पोसई दिपक पाठक, पोसई चाहेर, पोहेकॉ नंदकुमार सांगळे, पोहेकॉ राजपुत, पोनापोना. विष्णु भागवत, पोकॉ. किशोर जाधव, पोकॉ सुरज देशमुख, पोकॉ. नवनाथ दहिफळे, पोकों सानप, मोबाईल सेलचे पोलीस कॉन्स्टेबल राहुल गुंडु यांचे पथकाने केली आहे.

पाथर्डी तहसीलला निवेदन

जनतेच्या मूळ प्रश्नांना भाजप सरकारकडून बगल जनतेच्या भल्यासाठी लढत राहणार - शिवशंकर राजळे

दै.जनप्रभात

कासार पिंपळगाव

सामान्य जनता,शेतकरी,बेरोजगार युवक,अंगणवाडी कर्मचारी, छोटे व्यवसायिक,पेट्रोल-डिझेल-घरगुती गॅसची भाव वाढ या सर्वांच्या अडचणी समजून घेण्याऐवजी भाजप शासित केंद्र आणि राज्य सरकार जनतेचं लक्ष अन्य फालतू गोष्टी करुन विचलित करत आहे.मूळ प्रश्नांना बगल देऊन मराठा-ओबीसी, हिंदू-मुस्लिम असे वादविवाद निर्माण करण्यात हे लोक सध्या व्यस्त आहेत.हे करूनही जनता विरोधात आहे हे जाणून आता इंडिया आघाडीच्या नेत्यांवर दबाव आणून आमच्या बाजूला या नाहितर जेल मध्ये जा आशा धमक्या दिल्या जात आहेत.अनेक राज्यकर्ते या दबावाला बळी पडून भाजपामध्ये जातात किंवा आघाडी करत आहेत.परंतु या दबावाला बळी न पडता प्रखरपणे सरकारच्या चुकीला चूक म्हणण्याची हिंमत देशातील एक मोठे आदिवासी नेते झारखंड चे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना खोट्या केस मध्ये अटक केली आहे तसेच महाराष्ट्रातले उभरते युवा नेतृत्व आमदार रोहित पवार यांना अडचणीत आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहे, परंतु आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, महागाईने पिचलेली सर्वसामान्य जनता अधिक जोरकसपणे याला विरोध करत राहू तसेच बेरोजगार तरुणांसाठी शासकीय भरती प्रक्रिया,कापूस-कांदा-सोयाबीन यासारख्या शेतमालाला योग्य भाव, महिला सुरक्षा,आरक्षण, आमच्या शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील औद्योगिक वसाहत सारख्या विविध प्रश्नांवर आवाज उठवत राहू,यासंबंधीच निवेदन पाथर्डी तहसीलदार यांना दिले. व प्रशासनाने याकडे गांभीर्यने पहावे असे सुचवण्यात आले आहे. निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) पाथर्डी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, सिताराम बापु बोरुडे, नगरसेवक बंडु बोरुडे सह पदाधिकारी यांच्या सह्या आहेत.



शहराला शुद्ध पाणी पुरवठा न झाल्यास आंदोलन :-आष्टी भाजपा

आष्टी भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक अँड मनीष ठोंबरे व सहकाऱ्यांनी केलेल्या तक्रारीवरून मी स्वतः आणि उपाध्यक्ष जाकीर हुसेन,संबंधित अभियंता हरिभाऊ ऊईके त्यांचे आणि शेजारील तक्रारकर्ता मानकर यांच्या घरी पाणी तपासले असता पाणी शुद्ध आढळून आले त्यामुळे बिनबुडाचा आरोप करण्यापूर्वी आरोपातील तथ्य लक्षात घेणे महत्त्वाचे आहे राजकीय प्रसिद्धी मिळवण्याच्या नादात काहीही स्टंट करू नये

अनिल धोत्रे
अध्यक्ष नगरपंचायत आष्टी

==========

भाजपा शहराध्यक्ष नगरसेवक अँड मनीष ठोंबरे व सहकारी कार्यालयात आले तेव्हा न.पं. अध्यक्ष आणि मी स्वतः हजर होतो त्याच दरम्यान आम्ही पाणी शुद्धतेबद्दल दर आठवड्याला अहवाल घेण्याचे पाणीपुरवठा विभागाला सक्त ताकीद दिली आहे शिवाय दुसऱ्या दिवसी पाणी सोडण्याच्या वेळेवर त्यांच्या घरी जाण्याचे कबूल केले तेव्हा नगरसेवक ठोंबरे, तक्रारकर्ता मानकर व पाणीपुरवठा अभियंता हरिभाऊ उईके यांच्या उपस्थितीत पाणी तपासले असता शुद्ध आढळून आले शिवाय अशुद्ध पाणी पुरवठा हा संपूर्ण वार्डाला होत असतो एक दोन घरी नव्हे त्यामुळे आरोपात अजिबात तथ्य नसून हा एक राजकीय स्टंट आहे

जनाब जाकीर हुसेन
न.पं.उपाध्यक्ष आष्टी



अवधूत शेंद्रे

वर्धा :- आष्टी(श):- शहरात काही दिवसापासून दुषित पाणी पुरवठा होत असल्याबद्दल लेखी आणि तोंडी निवेदन नगरपंचायत प्रशासनाला दिले मात्र अद्यापही पाणीपुरवठा विभाग शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी दखल घेत नाही आहे त्यासाठी लवकरात लवकर शहरात शुद्ध पाण्यासाठी आंदोलन उभे करावे लागेल असे आष्टी शहर भाजपा यांच्यावतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे पुढे निवेदनात असे म्हटले आहे की नागरी वस्तीतील अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे कित्येक लोक आजारी पडत आहे पुरावा दाखल पाण्याचे नमुने घेऊन नगर पंचायत येथे नगराध्यक्ष अनिल धोत्रे व उपाध्यक्ष जनाब जाकीर हुसेन यांना दाखवून दुषित पाणी पुरवठा लक्षात आणून दिला.तेव्हा यावर कारवाई करण्याचे आश्वासन दिले पण दिलेल्या मुदतीत आष्टी शहराला होत असलेला दुषित पाणी पुरवठा लवकरात लवकर शुद्ध पाण्यासह सुरळीत न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा आष्टी शहर भाजपा यांनी दिला यावेळी भाजप शहर अध्यक्ष अॅड मनिष ठोंबरे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष अनिरुद्ध दंडाळे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष भुषण सिंग टाक, प्रज्वल चोहतकर, अविनाश कदम, रामा भाऊ मानकर, प्रसाद मोकद्दम व इतर भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

भेंडाबुद्रुकसरपंचपदी सौ.रोहिणी निकम

दै.जनप्रभात

भेंडा : नेवासा तालुक्यातील निर्मलग्रामभेंडा बुद्रुक ग्रामपंचायत सरपंचपदी सौ.रोहिणी नामदेव निकम या ९ मतांनी विजयी झाल्या आहेत.भेंडाबुद्रुक ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच सौ.उषा लहानू मिसाळ यांनी पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्यासरपंचपदाची निवड गुरुवार दि.१ फेब्रूवारी रोजी झाली. अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत सौ.सुहासिनी किशोर मिसाळ व सौ.रोहिणी नामदेव निकम यांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. या पैकी कोणत्याच उमेदवाराने अर्ज मागे न घेतल्याने दुपारी २ वाजता मतदान प्रक्रिया घेण्यात आली. एकूण १७ पैकी ९ सदस्य मतदानाकरिता उपस्थित होते. वैशाली शिवाजी शिंदे,संगीता गणेश गव्हाणे,संगीता नामदेव शिंदे,रोहिणी नामदेव निकम, अण्णासाहेब विठ्ठल गव्हाणे, पंढरीनाथ रामराव फुलारी, मंगल अरुण गोडें,स्मिता देवेंद्र काळे, लताबाई यडू सोनवणे या ९ सदस्यांनी हातवर करून सौ.रोहिणी निकम यांना मतदान केल्याने त्या सरपंच पदी विजयी झाल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी घोषित केले. सुहासिनी किशोर मिसाळ,स्वाती अशोक वायकर,सौ. उषा लहानू मिसाळ, दादासाहेब हौशीराम गजरे,संजय गोरक्षनाथ मिसाळ, माया दत्तू गंगावणे,कादर अब्दुल सय्यद, दिलीप भास्कर गोडें हे ८ सदस्य अनुपस्थित होते. कुकाणा मंडलाधिकारी सौ.तृप्ती साळवे यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांना ग्रामविकास अधिकारी रेवनाथ भिसे,तलाठी बद्रीनाथ कमानदार यांनी सहाय्य केले.



लेखा व कोषागार दिन उत्साहात

अधिकारी, कर्मचार्यांचे उत्स्फुर्तपणे रक्तदान



दै.जनप्रभात शहर प्रतिनिधी

नगर : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जिल्हा कोषागार कार्यालयात लेखा व कोषागारे दिन अत्यंत उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. संचालनालयातील विविध घटकांना एकत्र आणुन बंधुत्वाची भावना वाढीस लागण्याबरोबरच कोषागार कार्यालयाच्या प्रगतीला चालना मिळावी या उद्देशाने येथील नवीन प्रशासकीय इमारतीमधील जिल्हा कोषागार कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे नियंत्रक सदाशिव पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, महानगरपालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन धस, विशाल पवार, स्थानिक निधी लेखा परिषदेचे सहायक संचालक बाबासाहेब घोरपडे जिल्हा कोषागार अधिकारी भाग्यश्री जाधव भोसले आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांनी मनोगतात कोषागाराचे प्रशासनातील महत्व सांगत लेखाविषयक काम पहाणार्या प्रत्येक शासकीय कर्मचार्यांनी लेखाविषयक काम करताना आपल्या कामात अचूकता ठेवावी, यासाठी सर्व वित्तीय नियमांचा अभ्यास केला पाहिजे, असे सांगितले. कोषागारातील सर्व अधिकारी व कर्मचार्यांच्या कामकाजाबाबतही अभिनंदन केले. यावेळी उत्कृष्ट काम करणार्या कर्मचार्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कारही करण्यात आला. यावेळी जिल्हा कोषागार कार्यालय व जिल्हा कोषागार कर्मचारी संघटना यांच्यावतीने भव्य अशा रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीराचेही आयोजन करण्यात आले होते. सर्व अधिकारी, कर्मचार्यांनी या रक्तदान शिबीरामध्ये सहभाग नोंदवत उत्स्फुर्तपणे रक्तदानही केले. कार्यक्रमास लेखा व कोषागार कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र भूषण : अशोक सराफ

मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा अशोक सराफ यांना २०२३ सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्र भूषण हा महाराष्ट्राचा सर्वोच्च पुरस्कार आहे. अशोक सराफ यांच्यासारख्या जेष्ठ अभिनेत्याला हा पुरस्कार जाहीर झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. योग्य व्यक्तीला योग्य वेळी मिळालेला योग्य पुरस्कार असेच या पुरस्काराचे वर्णन करता येईल. महाराष्ट्र सरकारने अशोक सराफ यांना हा पुरस्कार देऊन त्यांच्या पाच दशकांच्या अभिनय कारकीर्दीचा योग्य गौरव केला या बद्दल महाराष्ट्र सरकारचे आभार मानावे लागेल. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी मुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डि. जि. टी विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाडरे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हमद्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या समवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्षा या जोडीने मराठी चित्रपटसृष्टित अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली. सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या. वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली. अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून, गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू , शुभमंगल सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे ब ा प ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त , संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत. हम पांच, टन टना टन टन, डोन्ट वरी हो जायेगा, छोटी बडी बाते यासारख्या काही टीव्ही मालिका देखील त्यांनी केल्या. त्यांनी भूमिका केलेले हमीदा बाईची कोठी, अनधिकृत मनोमिलन, हे राम, कार्डिओग्राम, सारखं छातीत दुखतंय ही नाटकेही खूप गाजली. चित्रपट, टीव्ही, रंगमंच अशा तिन्हीं माध्यमातून त्यांनी आपल्या अभिनयाची मुशाफिरी केली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २०० हुन अधिक चित्रपटात भूमीका केल्या. रंजना, उमा भेंडे, प्रेमा किरण, निवेदिता जोशी, वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, अलका कुबल, प्रिया बेर्डे, किशोरी शहाणे या आणि अशा अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी भूमिका केल्या. विशेष म्हणजे या सर्व अभिनेत्री त्यांना सेटवर मामा म्हणत. आज तर ते संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मामा झाले आहेत. आज त्यांना अशोक मामा याच नावानेच ओळखले जाते. अशोक सराफ यांना अशोक मामा हे नाव कसे पडले हे पाहणे देखील रंजक आहे. एका चित्रपटाच्या सेटवर प्रकाश शिंदे नावाच्या कॅमेरामन सोबत त्यांची मुलगी येत असत. सेटवर आली की ती विचारत असे, हे कोण ? त्या कॅमेरामनने सांगितले हे अशोक सराफ पण तू यांना मामा म्हणायचे. त्या मुलीसोबत सेटवरील सर्वजण त्यांना मामा म्हणू लागले पुढे हेच नाव रुढ झाले आणि अशोक सराफचे अशोक मामा बनले. अशोक सराफ यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले आहेत मात्र ते नेहमी म्हणतात की प्रेक्षकांच्या मनात मी स्थान निर्माण करू शकलो हाच माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे आणि ते सत्यही आहे. अशोक सराफ यांच्यावर मराठी प्रेक्षकांनी जितके प्रेम केले तितके कोणत्याच अभिनेत्यावर केले नसेल. जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण करून प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या या विनोदाच्या अभिनय सम्राटाचा महाराष्ट्र भूषण हा महाराष्ट्राचा सर्वोच्च पुरस्कार देऊन महाराष्ट्र सरकारने योग्य असा गौरव केला आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल विनोद सम्राट अशोक सराफ यांचे हार्दिक अभिनंदन!



दै.जनप्रभात

श्याम ठाणेदार,
दौंड जि. पुणे

इव्हींम हटाओ, लोकतंत्र बचाओ; दिल्लीत जोरदार निदर्शने शरद पवार देखील उपस्थित तर EVM फोडा! – प्रकाश पोहरे

दै.जनप्रभात
काटोल/प्रशांत पवार

दिल्ली मध्ये इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन्स (एतच्) विरोधात सामूहिक आक्रोश आणि निषेध व्यक्त करण्यात आला. हजारो भारतीय नागरिकांनी दिल्लीच्या रस्त्यावर एकत्र येत निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन्स (एतच्) च्या वापराविरुद्ध आवाज उठवला. भारत मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष वामन मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली एतच् विरोधात मोठे आंदोलन करण्यात आले. देशात होत असलेल्या अन्यायकारक निवडणुकांविरोधात हा आवाज उठवला जात असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आल्या होत्या. यावेळी हजारो लोक जंतरमंतर येथे जमले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देशांनी निवडणुकीमध्ये ईव्हीएमला (एतच्) झुगारलेले आहे. तेथे सर्वत्र मतपत्रिकेडरेच मतदान घेतले जात आहे, परंतु आपल्या देशात ईव्हीएमला (एतच्) मोठ्या संख्येने नागरिकांचा विरोध असल्यावरही निवडणुकीत ईव्हीएमचा (एतच्) वापर केला जात आहे. ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर अनेक संस्थांनी प्रश्न उपस्थित करून, कोर्टात यासंदर्भात याचिका दाखल केलेल्या आहेत. त्यावर कोर्ट निर्णय देत नाही, सर्वच स्वायत्त संस्थांवर मोदी सरकारने कब्जा केलेला आहे. त्या माध्यमातून विरोधकांवर अनेक गुन्हे दाखल केले जात आहेत. ही लोकशाहीची शोकांतिका आहे. जर देशातील लोकशाही वाचवायची असेल, तर ईव्हीएम हटविणे जरुरी आहे. नागरिकांनी ईव्हीएम विरोधात लढा उभारावा, असे आवाहन या आंदोलकांनी केले आहे. भारत मुक्ती मोर्चातर्फे अशा प्रकारे संपूर्ण देशभरात आंदोलने करण्यात येत आहेत. 'एतच् स्कॅम एक्सपोज राष्ट्रीय परिवर्तन यात्रा – भाग २' असे नाव या चळवळीला देण्यात आले आहे. याडरे भारतीय लोकशाही वाचवण्यासाठी, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, स्वतंत्र आणि निःपक्षपाती व्हावी यासाठी भारतीय निवडणूक आयोगाकडे निवडणूक प्रक्रियेमधून ईव्हीएम (एतच्) हटविण्याची मागणी केली जात असल्याचे बोलले जाते. भारत मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष वामन मेश्राम यांनी या निवडणूक प्रक्रियेवर सडकून टीका करताना, 'ईव्हीएम मशीन चोर आहे,



निवडणूक आयोग चोरांचा नेता आहे.' असे म्हटले आहे. वामन मेश्राम हे ऑल इंडिया बॅकवर्ड अँड मायनॉरिटी कम्युनिटी एम्प्लॉईज फेडरेशन (इअचउएक्स) चे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. त्यानी सर्व विरोधी पक्ष आणि खछ्ठखअ आघाडीला देखील ईव्हीएम (एतच्) विरुद्धच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. निवडणूक प्रक्रियेतील इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन्स (एतच्) च्या वापराविरुद्ध, तसेच भारत मुक्ती मोर्चाने सुरु केलेल्या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे भारत मुक्ती मोर्चाने आयोजित केलेल्या आंदोलनाला राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी संबोधित केले. ईव्हीएमवर बंदी आणण्यासाठी, मतपत्रिका परत आणण्यासाठी करण्यात आलेल्या या आंदोलनाला शरद पवार यांनी पाठबळ दिले.

निवडणुकीसाठी ईव्हीएम (एतच्) विश्वासार्ह नसून मतपत्रिकेडरेच (इू इश्रश्रेीं झरशिऔी) मतदान (तींळपस) घेण्यात यावे, अशी मागणी शेतकरी नेते तथा ज्येष्ठ पत्रकार प्रकाश पोहरे (झअॅरज़रीह झेहरअॅश) यांनी केली आहे. दिल्लीतील जंतरमंतर येथे भारत मुक्ती मोर्चाने आयोजित केलेल्या आंदोलनात पोहरे सुद्धा आज(१ फेब्रुवारी) सामील झाले होते. प्रकाश पोहरे यांनी यावेळी भारतीय निवडणूक आयोगावर सडेतोड प्रहार केला. ते म्हणाले की, ईव्हीएममशीन भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल) या कंपनी मार्फत बनवली जाते. या कंपनीच्या सात संचालकांपैकी चार भाजपचे नेते आहेत. पोहरे म्हणाले की, स्वतःला रामभक्त म्हणवून घेणाऱ्यांनी रामायणातून काही शिकायचे की नाही..? रामायणात आपण पाहिले असेल किंवा वाचले असेल की, जेव्हा सीता मातेच्या विश्वासार्हतेवर कुण्या एकाने प्रश्न उपस्थित केला, तर सीता मातेला प्रभू श्री रामचंद्रांनी अग्निपरिक्षा देण्यास बाध्य केले होतेत्याप्रमाणे आपल्या देशातील नागरिक मोठ्या संख्येने जेव्हा ईव्हीएमवर(एतच्) अविश्वास दाखवून सरकार आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर व त्यांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित करीत आहेत, तेव्हा स्वतःला रामभक्त म्हणवून घेणारे सरकार 'ईव्हीएम'ऐवजी मतपत्रिकेडरे मतदान घेण्याचा ठराव करून 'सीता' मातेसारखी 'अग्निपरिक्षा' का देत नाहीत? असा तात्विक सवाल प्रकाश पोहरे यांनी केला. या संदर्भामध्ये तांत्रिकदृष्ट्या विश्लेषण करताना पोहरे म्हणतात की, ईव्हीएमला व्हीव्हीपॅट (ततझअढ) ऐवजी प्रिंटर का लावत नाहीत? मशीनला 'व्हीव्हीपॅट'ऐवजी प्रिंटर जोडला पाहिजे, असे त्यांनी म्हटले, म्हणजे दूध का दूध, पानी का पानी होईल. देशातील मोठ्या संख्येने नागरिक जेव्हा ईव्हीएमला विरोध करीत आहेत, तेव्हा भाजपा सरकारकडून ईव्हीएमसाठी अट्टाहास का केला जात आहे? असा सवाल प्रकाश पोहरे करीत आहेत. तसेच ते जनतेला आवाहन करीत आहेत की, जर ईव्हीएमवर शंका असेल, तर ईव्हीएमवर निवडणुका घेण्यास कडाडून विरोध करा, हवे तर ईव्हीएम मशीन्स फोडून टाका, असेही ते म्हणाले.

लोकनेते शहाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बोराटवाडी ता इंदापूर जि पुणे येथील विद्यार्थ्यांचे शासकीय चित्रकला स्पर्धेत घवघवीत यश



दै.जनप्रभात
सातारा /जीवन मोहिते :

शासकीय चित्रकला परीक्षा २०२३- २४ चा निकाल ३१ जानेवारी २०२४ रोजी लागला. यामध्ये विद्यालयातील *कुमारी तनिष्का संजय कोकरे,चि. गुरुप्रसाद सचिन कुंभार,चि.रोहित दीपक भोसले, चि.ओमराज राजेंद्र रणमोडे हे चार विद्यार्थी अ ग्रेड मध्ये उत्तीर्ण झाले.२६ विद्यार्थी इ ग्रेड तर १६ विद्यार्थी उ ग्रेड मिळवून उत्तीर्ण झाले.परिक्षेसाठी एकूण ४२ विद्यार्थी बसलेले होते.

या विद्यार्थ्यांना विद्यालयातील कलाशिक्षक श्री.नवनाथ कुंभार सर यांनी मार्गदर्शन केले.संस्थेचे अध्यक्ष , महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार व संसदीय कार्य मंत्री मा.श्री.हर्षवर्धन पाटील साहेब, संचालक मा.श्री.उदयसिंह पाटील, सचिव श्री.किरणराव पाटील, सर्व संचालक मंडळ,विद्यालयाचे प्राचार्य श्री.भीमराव आवारे यांनी अभिनंदन केले.

कोकिसरे येथे धम्म प्रशिक्षणार्थी महिलांचे प्रशिक्षण



महामानव यांच्या प्रतिमेस व मूर्तींना पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करताना मान्यवर.

दै.जनप्रभात **सातारा /जीवन मोहिते:**

भारतीय बौध्द महासभा मोरणा विभागातील कोकिसरे येथे धम्म प्रशिक्षणार्थी महिलांचे धार्मिक धम्म प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबीरार्थीना विविध विषयांवर उदाहरणासह गोष्टीरुपात साध्या व माड्या भाषेत धम्म समजावून सांगण्यासाठी रायगड जिल्हा भारतीय बौध्द महासभेच्या आदर्श केंद्रिय शिक्षिका रत्नमाला जाधव कोकिसरे येथे राहून धम्मप्रसार प्रचारार्थ महान कार्य करत आहेत.या शिबीराचे उद्घाटक आणि मार्गदर्शक एन. एम. आगाणे (काका),पाटण तालुका शाखा संस्कार विभाग उपाध्यक्ष दगडू तांदळे (हिशोब तपासणीस), ऍड.राहुल आबासाहेब भोळे आदींनी मार्गदर्शन केले.याकामी,रविंद्र बनसोडे,अनिल बनसोडे,भागवत बनसोडे, सावळाराम बनसोडे व महिला मंडळाने अथक असे परिश्रम घेतले.

ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सर्जेराव रामभाऊ टेकाळे यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे लोहा येथे आयोजन



दै,जनप्रभात
उपसंपादक / राठोड रमेश पंडित

नांदेड/लोहा : पंचायत समितीचे जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री सर्जे राव रामभाऊ टेकाळे यांची ३१ जानेवारी २०२४ रोजी आपल्या सेवेतून निवृत्ती झाली आहे. अनेक वर्ष शासकीय सेवेच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक न्याय देण्याचे कार्य केला आहे त्यामुळेच ते गाव ,वाडी, तांडा वस्ती येथे आपल्या कार्य शैली मुळे प्रचलित आहेत. मूळचे धाराशिव जिल्ह्यामधील मुरुड जवळील काठवड गावचे ते रहिवासी असून . त्यांचा जन्म १७ जानेवारी १९६६ रोजी एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबामध्ये झाला. लहानपणापासूनच अतिशय हुशार असलेले टेकाळे सर शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी इथपर्यंतचा त्यांचा प्रवास गौरवण्यासारखा आहे. म्हणूनच लोहा तालुका जिल्हा परिषद व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा शिक्षक सत्कार समन्वय समिती शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सर्जेराव रामभाऊ टेकाळे यांचा सेवापुर्ती सन्मान गौरव सोहळा दिनांक ३ फेब्रुवारी २०२४ शनिवार रोजी दुपारी ठीक १वाजून १५ मिनिटांनी व्यंकटेश गार्डन मंगल कार्यालय लोहा येथे आयोजित केला . या कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर आणि इतर सर्व मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी सर्वांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे असे आवहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

केंद्रीय वस्तू सेवा कर आणि केंद्रीय उत्पादन शुल्क, विभाग शहर आणि विभाग कळमेश्वर, नागपूर-खख आयुक्तालयाच्या नवीन कार्यालय परिसराचे उद्घाटन



दै.जनप्रभात
नागपूर, दिलीप येवले-

केंद्रीय वस्तू सेवा कर आणि केंद्रीय उत्पादन शुल्क, विभाग शहर आणि विभाग कळमेश्वर, नागपूर-खख आयुक्तालयाच्या नवीन सचिवालय इमारत, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे नवीन कार्यालय परिसराचे उद्घाटन ०२ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. मुख्य आयुक्त के. सी. जॉनी, मनोज श्रीवास्तव यांच्या हस्ते नवीन कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

प्रधान आयुक्त, नागपूर-१ अतुलकुमार रस्तोगी, आयुक्त नागपूर-२ अविनाश थेटे, सीमा आयुक्त संजय कुमार, अपील आयुक्त प्रदीप कुमार बोहरा, लेखापरीक्षा आयुक्त विजय ऋषी केंद्रीय वस्तू सेवा कर विभागचे सर्व अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

एम्स नागपूर येथे अत्याधुनिक स्किल लॅब तसच सेंट्रल स्टेराइल सर्व्हिसेस डिपार्टमेंट या सुविधेचे केंद्रीय आरोग्य आणिकुटुंब कल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या हस्ते ३ फेब्रुवारीला होणार उद्घाटन

दै.जनप्रभात
नागपूर, दिलीप येवले

नागपूरच्या मिहान स्थित केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालया अंतर्गतअखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था एम्स नागपूर येथे अत्याधुनिक स्किल लॅब तसेच सेंट्रल स्टराइल सर्व्हिसेस डिपार्टमेंट - सीएसएसडी या सुविधेचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती प्रवीण पवार, एस. पी. सिंग बघेल आणि एम्स नागपूरचेकार्यकारी संचालक डॉ. हनुमंथा राव, यांच्या उपस्थितीमध्ये उद्या ३ फेब्रुवारी शनिवार रोजी सकाळी १० वाजता दुरुस्थ पद्धतीने होणार आहे. या कार्यक्रमाचा मुख्य समारंभराजस्थानच्या एम्स जोधपुर येथे होणार आहे. एम्स नागपूर येथीलकौशल्य प्रयोगशाळा ही अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज आहे ह्युमन पेशंट सिमुलेटर आणि वर्चुअलटास्क ट्रेनर्स या प्रमुख सुविधांनी सुसज्ज अशा या प्रयोगशाळा राहतील. या प्रयोगशाळामुळेकौशल्य प्रशिक्षण आपत्कालीन परिस्थिती, अनस्थेशिया सिमुलेशनआणि परिस्थिती आधारित शिक्षण या उपक्रमांना चालला मिळणार आहे. या सुविधेमुळे वास्तविकरुग्णांना धोका न देता शिकण्यासाठी एका सुरक्षित वातावरणाची निर्मिती होणार असून अत्याधुनिकवर्चुअल टास्क ट्रेनर सुविधांमध्ये पेशंट केअरसिमुलेटर, इंजेक्शन आणि प्रक्रिया सिमुलेटर यासारख्या विविध कौशल्य सिमुलेटरचा समावेश आहे. या स्किललॅबचा वैद्यकीय शिक्षण आणि प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदाहोईल. वैद्यकीय विद्यार्थी, रहिवासी डॉक्टर, परिचारिका, प्राध्यापक आणि इतर आरोग्य सेवा कर्मचा-यांना त्यांचे कौशल्यआणि ज्ञान या प्रयोगशाळेच्या माध्यमातून वाढवता येणार आहे . यासोबतच सेंट्रल स्टेराइलसर्व्हिसेस डिपार्टमेंट - सीएसएसडी ही एक प्रशस्तअशी सुविधा ५ हजार चौरस फूट परिसरात मेडिकलस्ट्रलायझेशन तंत्रज्ञानामध्ये रुग्णांची काळजी आणि सुरक्षिततेची सर्वोच्च मानके सुनिश्चितकरेल. या सुविधेमध्ये अत्याधुनिक प्रगत उपकरणे, तंत्रज्ञान, कार्यक्षम प्रणाली , २४ तास अखंड सेवा यांचा समावेश आहे.

भारतीय बौद्ध महासभेसह तत्सम संघटनांनी ईव्हीएमबाबत तहसीलदार यांना निवेदन सादर !

दै.जनप्रभात
सातारा/जीवन मोहिते:

भारतीय बौद्ध महासभा व तत्सम संघटनांच्यावतीने तहसीलदार यांना कराड तालुकास्तरीय ईव्हीएम हटाव संदर्भात महासभेचे अध्यक्ष बी.जी. माने,गायकवाड गुरुजी,नंदकुमार भोळे,विजय सावन्त,स्वप्नील कांबळे आदिनी निवेदन दिले.

यावेळी महासभेचे पदाधिकारी, माजी श्रामनेर,महीला पदाधिकारी,बौद्धाचार्य, उपासक, उपासिका तसेच तालुक्यातील सर्व राजकीय पक्ष संघटना, सामाजिक संघटना,कराड शहर कार्यकारिणी,अध्यक्ष,सर्व पदाधिकारी,महीला पदाधिकारी, कराड तालुकेतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्यावर श्रद्धा असणाऱ्या सर्व सामाजिक धार्मिक,राजकीय गावपातळीवरील सर्व स्थानिक मंडळे यांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

सन २०२४च्या लोकसभा निवडणुकीत ईव्हीएम हटवून त्याऐवजी बॅलेट पेपरवरच मतदान घेण्यात यावे.अशा आशयाचे निवेदन आहे. निवेदनावर महाविहार बांधकाम अध्यक्ष व्ही.आर.थोरवडे, महासभेचे बी.जे.माने (तालुकाध्यक्ष),आप्पा अडसूळे (सरचिटणीस),संजीवन लादे(कोष्याध्यक्ष),आर.बी. पाटणकर (उपाध्यक्ष संस्कार विभाग), पदाधिकारी, अधिकारी, कार्यकते आदींच्या असंख्य स्वाक्षरी आहेत.



तहसीलदार यांना निवेदन सादर करताना बी.जे.माने शेजारी नंदकुमार भोळे व मान्यवर.

बैठक:प्रत्यक्ष बांधावर शेतकरी शास्त्रज्ञ मंचची बैठक

प्रत्यक्ष बांधावर शेतकरी कृषी शास्त्रज्ञ मंचची शेतकऱ्यांचे बांधावर बैठक।

दै.जनप्रभात
काटोल/प्रशांत पवार
कोंढाळी -प्रतिनिधी

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र, अंतर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल शेतकरी शास्त्रज्ञ मंचची बैठक मंचचे सदस्य प्रयोगशील शेतकरी महेंद्र पाटील ठवळे यांच्या कोंढाळी येथील शेताच्या बांधावर झाली. शेतकरी शास्त्रज्ञ मंचची गरज, कार्य आणि भविष्यात करावयाच्या कामांची माहिती या वेळी देण्यात आली. कृषी विज्ञान केंद्रच्या वतीने विविध प्रकारचे उपक्रम राबवण्यात येतात. त्याच अनुषंगाने शुक्रवार ०२फेब्रूवारी रोजी शेतकरी व कृषी शास्त्रज्ञ मंच बैठक झाली. या वेळी वरिष्ठ शास्त्रज्ञ उद्यानविद्यावेत्ता डॉ. मेघा डहाळे, किटक शास्त्रज्ञ डॉ.प्रदिप दवने, रोग शास्त्रज्ञ डॉ ऐकता बागडे,सहायक उद्यान वक्ता डॉ योगेश धार्मिक, तसेच एस.आर.ए. रमेश घाडगे, शाम पतिंगे, कृषी सहायक धनराज धरममाळी, काटोल तालुका कृषी सहायक प्रभाकर कुमरे, आदी कृषी शास्त्रज्ञ उपस्थित होते. या वेळी डॉ. मेघा डहाळे यांनी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची गरज, कार्य आणि भविष्यात करावयाच्या कामांची माहिती दिली. किटक शास्त्रज्ञ डॉ प्रदिप दवने यांनी संत्रा,मोसंबी या फळ पीका वरिल येणारा रोग, नवतीपानगळ , झाडे पिवळी पडण्याची कारणे,कोळसी,अंबीया बहार व्यवस्थापना सह शेत पीकांचे अन्नद्रव्य व्यवस्थापना बाबद माहिती दिली, रोग शास्त्रज्ञ डॉ ऐकता बागडे यांनी शास्त्रीय दृष्टिकोनातून शेती करण्याच्या पद्धती बाबद मार्गदर्शन करताना सांगितले की, डिंक्या संत्रा मोसंबी फळ बागा पिकातील एक मुख्य कीड असून, तिचे वेळीच नियंत्रण केले पाहिजे. खतांचे वापर, खतांचे नियोजन,तसेच

एकात्मिक पद्धतीने किडीचे नियंत्रण केल्यास किडीवर नियंत्रण करता येऊ शकते असे सांगीतल. नियंत्रण उपाय याविषयी पी. के व्ही चे अंतरंग प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल येथील



कृषी शास्त्रज्ञयांनी शेतकर्यांच्या बांधावर जाऊन शेतीशाळा वर्गास पथकाने पिकाविषयी विस्तृत मार्गदशन केले या पाहणी दौरा कार्यक्रमास डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल, तसेच काटोल तालुका कृषी विभाग, कृषी विषय विशेषज्ञ कृषि विज्ञान केंद्र कोंढाळी येथील व शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी येथील शेतकरी धनराज ठवळे, प्रकाश गुप्ता, बाबूराव ठवळे,विरेंद्र सिंह व्यास, जनार्दन ठवळे, प्रकाश बारंगे, महेंद्र ठवळे,वसंतराव घाटोळे, रमेश वंजारी,अनुज धांडे, देवराव उईके, भुजंगराव धोटे, सुधाकरराव ठवळे, वसंतराव कोचे, अंकित ठवळे,गौरव धांडे, दिनेश किनेकर, रूपराव गोंडाणे, तसेच दुर्गा प्रसाद पांडे यांनी कृषी शास्त्रज्ञां समक्ष कृषी विषयक अनेक प्रश्न उपस्थित केले. यावर कृषी शास्त्रज्ञयांनी आप आपल्या विषयासंबंधीत प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. : कृषी चिकित्सालयाची मागणी माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी या धोरणानुसार डॉ पंजाबराव कृषी विद्यापीठांचे अंतर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल चे कृषी शास्त्रज्ञ कोंढाळी येथील शेतकर्यांचे बांधावर पोहचून शेतीविषयक अडचनी व त्यावर उपाय या करीता प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.व शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेत योग्य ते मार्गदर्शन केले. या प्रसंगी येथील शेतकरी प्रकाश बारंगे यांनी शेतकऱ्यांचे पीकाचे नियोजन करते वेळी योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. यात पावसाचा अंदाज, पावसाची वेळ, माती परिक्षण, कुठल्या वातावरण कोणते पीक घ्यायचे, याबाबत वेळीच माहिती मिळणे फार गरजेचे आहे. या करीता शासनाने (कृषी मंत्रालयाने) राज्यातील कृषी मंडळ निहाय अद्ययावत कृषि चिकित्सालये सुरू करने फारच गरजेचे आहेअसे मत मांडले, व यावर राज्य सरकारने कृषी मंडळ निहाय कृषी चिकित्सालये सुरू करावी अशी मागणी केली. यावर सर्व शेतकऱ्यांनी ही या मागणीसाठी दुजोरा दिला.

चिचोंडी पाटील पोस्ट कार्यालयात सुविधांचा अभाव पत्राचे वजन बाहेरुन करुन आणण्याचा सल्ला,नागरिकांना भुर्दंड

दै,जनप्रभात
उपसंपादक / राठोड रमेश पंडित

चिंचोडी:- तालुक्यातील चिचोंडी पाटील येथील पोस्ट कार्यालयाची मोठी दुरावस्था झाली असून येथे सुविधांचा अभाव असल्याने नागरिकांना आर्थिक मनस्ताप सहन करावा लागत आहे कुठलेही पत्र पोस्टाने पाठवायचे असल्यास पोस्ट अधिकारी दुसरीकडून कोणत्याही दुकानातुन वजन करून आणण्याचा सल्ला ग्राहकांना देत आहेत यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून पोस्ट करत असलेल्या पत्राचे वजन करण्यासाठी दहा ते वीस रुपये आर्थिक भुर्दंड ही नागरिकांना सोसावा लागत आहे

पोस्ट कार्यालयातील वजन काटा सुमारे वर्षापासून बंद अवस्थेत असून नागरिकांना बाहेर कुठल्याही दुकानातून वजन करून आणा व वजन कागदावर लिहून घ्या असा सल्ला पोस्ट अधिकारी देताना पाहायला मिळतात यामुळे त्या पोस्ट केल्या जाणाऱ्या पत्राचे किंवा वस्तूचे वजन नेमके किती याबाबत अधिकाऱ्यांना कुठलीही कल्पना नसते यातून शासनाची फसवणूक होऊन नागरिकांनाही आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे त्याचबरोबर ज्या दुकानातून वजन करून आणले जाते तो दुकानदार संबंधित व्यक्तींकडून १० ते २० रुपये प्रत्येकी उकळण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे शासनाच्या सुविधा असूनही नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसण्याची वेळ ओढावल्याचे पहावयास मिळते त्याचबरोबर काल शुक्रवारी दुपारनंतर चिचोंडी पाटील पोस्ट कार्यालयाचे पत्रव्यवहार पाठवण्याचे कामकाज अचानक बंद ठेवण्यात आले होते मात्र चिचोंडी पाटील गावात शुक्रवारी मोठा बाजार भरत असल्याने परिसरातील अनेक गावचे नागरिक या ठिकाणी येत असतात मात्र त्यांना दुपारनंतर पाठवायचे पत्र न स्वीकारल्यामुळे अनेक नागरिकांना ससे हेलपाट मारण्याची वेळ आली आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात व योग्य ती कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे

वजन काटा खराब असल्याने वजन व्यवस्थित दाखवत नाही याबाबत वरिष्ठांनकडे माहिती कळवली आहे
-अरविंद देउतकर (पोस्ट अधिकारी,- चिचोंडी पाटील)

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा पिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242